# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### चंद्रपूर शहरात कोरोना केंद्रामध्ये रुग्णांची होत असलेली फसवणूक

**(१) ३३७९५ (१०-०१-२०२२). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर शहरात ४६ फिजीशियन डॉक्टर असून त्यातील अनेकांनी नवप्रशिक्षीत परिचारिका, शिकाऊ डॉक्टरांच्या नियुक्त्या करुन कोविड केअर केंद्र सुरु केले असल्याचे दिनांक ११ जुलै,२०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कोविड केंद्रात रुग्ण दाखल करते वेळी दिड ते दोन लाख रुपये रुग्णाला जमा करावे लागते त्यानंतर रुग्णास दाखल करुन घेतले जात असून या केंद्रात अनेक असुविधा असून तेथे उपचारापेक्षा अधिक रुपये बिल आकारुन रुग्णांची आर्थिक फसवणूक केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात प्रशासनाकडे अनेक तक्रारी दाखल झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,तद्नुसार सदरील कोविड केंद्रावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहक,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (३०-१०-२०२३) :** (१) (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) शासनाच्या कोविड-१९ संदर्भात अधिसूचनेत नमूद दरानुसार कोविड-१९ रुग्णांकडून दर आकारण्याबाबत खाजगी रुग्णालयांना कळविण्यात आले होते. तथापि चंद्रपूर महानगरपालिकेच्या हद्दीत असलेल्या खाजगी रुग्णालयांनी अतिरिक्त देयके आकारण्यात आल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यानुषंगाने अतिरिक्त देयकांचे मनपा मार्फत लेखापरिक्षण करुन सदर अतिरिक्त देयके कोविड रुग्णास परत करण्याबाबत खाजगी रुग्णालयांना कळविण्यात आले व अतिरिक्त देयके रुग्णास परत करण्यात आले आहे.

अतिरिक्त देयके आकारल्यासंदर्भात मनपा, चंद्रपूर मार्फत कोविड रुग्णालयांना नोटीस बजावण्यात आली असून काही रुग्णालयांवर कार्यवाही करण्यात आली आहे. त्यानुषंगाने डॉ. रितेश दिक्षीत यांचे कोविड केअर सेंटर बंद करण्यात आले आहे. तसेच डॉ. नरेंद्र कोलते, डॉ. अमित मुरके व डॉ. अमरिश बुक्कावार यांनी अतिरिक्त देयके कोविड रुग्णास परत केले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोरोना महामारीत आरोग्याची काळजी घेण्याबाबत छापलेली मार्गदर्शन पुस्तके रायगड जिल्हा परिषदेच्या इमारतीशेजारी आढळून आल्याबाबत**

**(२) ४४८२७ (०६-१०-२०२२). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने कोरोना महामारीत आरोग्याची काळजी घेण्याबाबत शासनाने कोटयवधी रुपये खर्च करुन छापलेली मार्गदर्शन पुस्तके रायगड जिल्हा परिषदेच्या अलिबाग येथील शिवतीर्थ इमारतीच्या बाजूला असलेल्या रस्त्यावर पडलेली माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड जिल्हा परिषदेच्या बेजबाबदार व निष्काळजी कारभारामुळे रस्त्यावर टाकलेली पुस्तके महिला व बालविकास आरोग्य विभागाची असल्याचे निश्चित झाले असून कोरोना महामारीत आरोग्याची काळजी घेण्यासंदर्भात जनजागृतीसाठी छापण्यात आलेली मार्गदर्शन पुस्तके जिल्हा परिषदेच्या बेजबाबदार कारभारामुळे नागरिकांना न वाटता नवीन कोरी पुस्तके रस्त्यावर टाकण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्या अनुषंगाने कोरोना महामारीसारख्या आजाराला आळा घालण्यासंदर्भात निष्काळजीपणा करणाऱ्या रायगड जिल्हा परिषदेच्या दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (३०-१०-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.

कोराना महामारीत आरोग्याची काळजी घेण्यासाठी शासना मार्फत मार्गदर्शक साहित्य, पुस्तके जिल्हा स्तरावर पाठविण्यात आली होती. सदर साहित्य जिल्हा स्तरावरुन तालुका स्तरावर वाटप करावयाचे होते. त्यानुषंगाने जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा रायगड यांनी जिल्हयांतर्गत सर्व तालुक्यांना वाटप करण्याच्या सूचना दिल्या होत्या. सदर सुचनेनुसार सर्व तालुक्यांनी साहित्य नेण्यासाठी त्यांच्या आवश्यकतेनुसार वाहने आणली होती. परंतु काही तालुके जिल्हा मुख्यालयापासून दूर असल्यामुळे त्यांना अलिबाग येथे पोहोचण्यास उशीर झाला. त्यामुळे सदर साहित्य जिल्हा परिषदेच्या इमारती खाली असलेल्या मेडिकल स्टोअर्सच्या जवळील रस्त्यावर ठेवण्यात आले होते. परंतू सदर साहित्य रात्री उशिरा पर्यंत सर्व तालुक्यांना वाटप करण्यात आले. यामध्ये कोणतेही साहित्य गहाळ झाले नाही व शासनाचे कोणत्याही प्रकारे नुकसान झाले नाही.

(३) सदर साहित्य वाटपास विलंब झाला असल्याने सदर साहित्य वाटप करणाऱ्या जिल्हास्तरीय गटप्रवर्तकास त्यांच्या मूळ आस्थापनेवर पाठविण्यात आले आहे. तसेच ज्या तालुक्यांना सदर साहित्य नेण्यास विलंब झाला आहे, त्या संबंधीत तालुका समुह संघटक यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच यापुढे शासकीय कामामध्ये हलगर्जीपणा होणार नाही याबाबत सर्व कर्मचाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात चांगल्या प्रतीच्या आरोग्य सुविधा उपलब्ध करणेबाबत**

**(३) ४६९२८ (११-१०-२०२२). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नागरिकांना चांगल्या प्रतीच्या आरोग्य सुविधा उपलब्ध होण्यासाठी प्रकल्प अंमलबजावणी आराखडयात नाविन्यपूर्ण उपक्रमांचा समावेश करण्याच्या सुचना मा. सार्वजनिक आरोग्य मंत्री यांनी विभागास दिल्या असल्याची बाब माहे एप्रिल, २०२२ च्या तिस-या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे काय,

(२) असल्यास, यापुर्वी केलेल्या आरोग्य सुविधाबाबत आराखडयाची अंमलबजावणी अद्याप अपूर्ण असल्याने गाव तेथे आरोग्य केंद्र न झाल्याने अनेक गावांत आरोग्यसेवा मिळत नसल्याने नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यासंदर्भात शासनाची भुमिका काय आहे,

(३) असल्यास, राज्यातील सर्व गावांमध्ये आरोग्याच्या सुविधा सामान्य जनतेला मिळण्यासाठी तसेच जेनरिक औषध दुकाने सुरु करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय?
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (२०-१०-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) Health &; wellness या कार्यक्रमातंर्गत राज्यामध्ये १८६१ प्राथमिक आरोग्य केंद्र, ८३३७ उपकेंद्र व ५१७ शहरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे रूपांतरण आरोग्यवर्धिनी केंद्रात करण्यात आलेले आहे. सदर केंद्रामार्फत खालील नमुद १३ प्रकारच्या सेवा रूग्णाना गाव पातळीवर देण्यात येतात.

१. प्रसुतीपूर्व व प्रसुती सेवा
२. नवजात अर्भक व नवजात बालकांना दिल्या जाणाऱ्या सेवा
३. बाल्य व किशोरवयीन आजार व लसीकरण सेवा
४. कुटुंब नियोजन, गर्भ निरोधक व आवश्यक आरोग्य सेवा
५. सामान्य रोगांची बाहय रूग्ण सेवा
६. संसर्गजन्य रोग नियोजन व तपासणी
७. असंसर्गजन्य रोग व तपासणी
८.मानसिक आरोग्य नियोजन व तपासणी
९. नाक, कान , घसा, व डोळे सामान्य आजार संबंधीच्या सेवा
१०. दंत व मुखरोग आरोग्य सेवा
११. वाढत्या वयातील आजार व परिहारक उपचारक
१२. प्राथमिक उपचार व आपत्कालीन सेवा
१३. आयुष व रोग

(३) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या दिनांक ११.०७.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासकीय वैद्यकीय/दंत महाविद्यालये व रूग्णालयांमध्ये जेनेरिक औषधे दुकाने सुरू करण्यास परवानगी देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वाढवण बंदर (जि पालघर) प्रकल्पाबाबत

**(४) ५०५४७ (०९-०३-२०२३). श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील प्रस्तावित असणारे वाढवण बंदर हे पुन्हा नव्याने सुरु करण्याची शासनाने तयारी केल्याने स्थानिक कोळी बांधवांनी दिनांक २ आक्टोंबर २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शने केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन १९९८ मध्ये रद्द करण्यात आलेला वाढवण प्रकल्प पुन्हा नव्याने उभारण्याचा प्रयत्न झाल्यास पारंपारीक मासेमारी व्यवसाय व स्थानिक कोळीवाडे उध्वस्त होण्याचा धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरच्या प्रकल्पामुळे मुंबई-कुलाबा ते पालघर, डहाणू पर्यंतच्या मासेमारीवर विपरीत परीणाम होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वाढवण प्रकल्प रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय बनसोडे (०१-११-२०२३) :**(१) होय.
(२) व (३)
वाढवण बंदर हे मोठे बंदर (Major Port) म्हणून जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण (जेएनपीए) यांचे मार्फत विकसित करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतलेला असून त्याबाबत दि. १९.०२.२०२० अन्वये अधिसूचना निर्गमित करण्यात आली आहे.
बंदर प्रकल्पाची उभारणी करण्यासंदर्भात प्रकल्प आराखडा, विस्तृत प्रकल्प अहवाल आणि इतर अनुषंगिक बाबी जसे की, पर्यावरण अभ्यास, मासेमारीवरील परिणाम इ. संदर्भातील आवश्यक कार्यवाही जेएनपीए यांचेमार्फत करण्यात येत आहे. जेएनपीए यांच्याकडील प्राप्त माहितीनुसार, प्रस्तावित बंदरामुळे मासेमारीवर होणा-या परिणामांचा सेंट्रल मरीन फिशरीज् रिसर्च इन्स्टिट्यूट या केंद्र शासनाच्या
संस्थेकडून अभ्यास करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने प्रकल्पामुळे बाधित होणा-या मच्छिमारांशी सल्लामसलत करुन मच्छिमारांना नुकसान भरपाई देण्यासंदर्भात शासनाच्या धोरणानुसार उचित कार्यवाही करण्यात येणार आहे.
(४) व (५)
जेएनपीए बंदराची धारणक्षमता जवळजवळ पूर्ण होत आल्याने व भौगोलिक मर्यादांमुळे बंदराच्या भविष्यकालील विस्तारास आणखी वाव नसल्यामुळे,
जेएनपीएचे सॅटेलाईट पोर्ट म्हणून नवीन बंदर विकसित करण्याचा निर्णय केंद्र शासनाकडून घेण्यात आला आहे.

---

## आरोग्य विभागातील पद भरती प्रक्रियेमध्ये झालेली अनियमितता

**(५) ५६४६७ (१२-०६-२०२३). श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आरोग्य विभागातील पद भरती प्रक्रियेमध्ये तत्कालिन शासनाच्या काळात अनियमितता तसेच आर्थिक गैरव्यहार झाला असल्याची माहिती अनेक वृत्तपत्रांनी दिलेली आहे, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेली आरोग्य विभागाची ६२०० जागांची क व ड गटातील नोकर भरती परीक्षा अचानकपणे तत्कालीन मा.आरोग्यमंत्री व आरोग्य विभागाने रद्द केली असल्याने नोकरी न मिळाल्यामुळे अनेक परिक्षार्थींनी आत्महत्या केल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी शासन करणार आहे काय ?

**डॉ. तानाजी सावंत (०४-११-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.
वृत्तपत्रात अशा आशयाच्या बातम्या आलेल्या आहेत.
(२) हे अंशत: खरे आहे.
पेपर फुटीमुळे दाखल गुन्हयांच्या तपासामध्ये सकृतदर्शनी तथ्य आढळल्याने दि.२९.०६.२०२२ रोजी सदर पदभरती परिक्षा प्रक्रिया रद्द करण्यात आलेली आहे. तथापि, यामुळे अनेक परिक्षार्थीनी आत्महत्या केल्या ही बाब खरी नाही.
(३) सदर प्रकरणी आर्थिक व सायबर गुन्हे पुणे शहर येथे गुन्हे दाखल झाले आहेत. यावर फौजदार प्रक्रिया संहिता कलम १७३ (८) प्रमाणे तपास सुरू आहे. तसेच या प्रकरणाशी संबंधीत आरोपी शासकीय अधिकारी /कर्मचाऱ्यांना निलंबित करून विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे.

---

**अमरावती विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयातील प्रभारी वैद्यकीय अधिकारी शासकीय सेवेत असतानाही खासगी लॅब चालवित असल्याबाबत**

**(६) ५७८०० (२८-०४-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय (सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल ) येथील प्रभारी वैद्यकीय अधिकारी डॉ.अमोल नरोटे हे शासकीय सेवेत असतानाही खासगी लॅब चालवित असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी डॉ. अमोल नरोटे यांच्याकडे खुलासा मागितला असता त्यांनी संबंधित लॅब ही डॉ. विशाल नरोटे व डॉ. तृप्ती नरोटे यांच्या नावांची असल्याचे स्पष्टीकरण दिले परंतू सखोल चौकशी केली असतना ही लॅब डॉ. अमोल नरोटे यांच्या नावांवरच असुन लॅब संदर्भातील व्हिजीटीग कार्डवर डायरेक्टर म्हणून त्यांचेच नांव असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही ,खरे आहे काय,

(३) असल्यास, या लॅबमध्ये कोरोना रुग्णांची डी-डायमर टेस्टींग करुन लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाला असून शर्विन रुग्णालयातील लॅब टेक्निशियन म्हणून कार्यरत असलेले कर्मचारी यात सहभागी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुसार संबंधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२६-१०-२०२३) :**(१) (२) व (३) हे खरे नाही.

वैद्यकीय अधिक्षक, संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती यांचे कडून प्राप्त अहवालामध्ये नरोटे हेल्थकेअर पॅथॉलॉजी लॅब डॉ.विशाल नरोटे यांचे नावे असल्याबाबत संस्था नोंदणीकृत असल्याचे अभिलेखान्वये आढळून येते, तसेच डॉ.विशाल नरोटे यांच्याकडुन सदर लॅब डॉ.तृप्ती गोरटे यांचेकडे सुपुर्द करण्यात आली असून डॉ. अमोल नरोटे यांचा याच्याशी काहीही संबंध नाही. व्हिजीटींग कार्डवर डायरेक्टर म्हणुन जे नाव टाकलेले आहे ते हेतुपुरस्पर व जाणुनबुजुन परवानगीशिवाय टाकले असल्याबाबत वैद्यकीय अधिक्षक विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय अमरावती यांनी सादर केले आहे.

श्री. धनंजय खंदारे प्रयोगशाळा तंत्रज्ञान हे शासकीय कामकाज संपल्यानंतर कधी कधी मदत करत असतात व त्याचा मोबदला देखील घेत नाही असे प्राप्त अहवालावरून दिसून येते.

(४) जिल्हा शल्य चिकित्सक, अमरावती यांनी प्रस्तुत प्रकरणी चौकशी केली असून चौकशी अहवालानुसार डॉ. अमोल नरोटे यांनी विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय अमरावती येथील पदाचा स्विकार केल्यापासुन खाजगी व्यवसाय केल्याचे सिध्द होत नसल्याचे नमूद केले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य कामगार विमा महामंडळाचे प्रस्तावित असलेले रुग्णालये शासकीय जागेअभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(७) ५९०१३ (२४-०४-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर, सातारा, पेण, पनवेल, जळगाव व चाकण या ठिकाणी प्रस्तावित असलेले राज्य कामगार विमा महामंडळाचे रुग्णालये शासकीय जागेअभावी प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक येथील राज्य कामगार विमा रुग्णालयाचे रुपांतर सुपरस्पेशालिटी रुग्णालयात करण्याची लोकप्रतिनिधी यांची मागणी माहे जानेवारी, २०२३ च्या दुसऱ्या सप्ताहापर्यंत प्रलंबित आहे,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर ठिकाणी प्रस्तावित असलेले राज्य कामगार विमा महामंडळाचे रुग्णालय सुरु करण्यासाठी शासकीय जमीन उपलब्ध करून देण्यासाठी तसेच नाशिक येथील राज्य कामगार विमा रुग्णालयाचे रुपांतर सुपरस्पेशालिटी रुग्णालयात करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२३-११-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) नाशिक येथील राज्य कामगार विमा रुग्णालयाचे रुपांतर सुपर स्पेशालिटी रुग्णालयात करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि.२४.०२.२०२३ च्या पत्रान्वये मागणी केलेली असून, त्यासंदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब राकावि महामंडळ, नवी दिल्ली मुख्यालयाशी संबंधित असल्याने, सदरहू निवेदन त्यांच्याकडे पुढील कार्यवाहीस्तव राकावि महामंडळाकडे पाठविण्यात आले आहे.
तर पालघर, सातारा, पेण, पनवेल, जळगाव व चाकण येथे नवीन राज्य कामगार विमा रुग्णालय सुरु करण्याच्या दृष्टीने, आवश्यक जागा उपलब्ध करुन घेण्यासाठी राकावि महामंडळामार्फत एमआयडीसीच्या प्रादेशिक कार्यालयांशी तसेच संबंधित जिल्हाधिकारी यांचेशी सातत्याने पाठपुरावा सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुरूड (ता.मुरूड, जि.रायगड) खोरा बंदर येथे उभारलेले वाहनतळ सुरू करण्याबाबत**

**(८) ५९२८७ (२६-०४-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुरूड (ता.मुरूड, जि.रायगड) येथील प्रसिध्द असलेला जंजिरा किल्ला पाहण्यासाठी मोठया संख्येने येणा-या पर्यटकांना मेरिटाईम बोर्डाने खोरा बंदर येथे कोटयवधी रूपये खर्च करून उभारलेले वाहनतळ सुरू न केल्यामुळे वाहन चालक व नागरिकांना दररोज मोठया अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त विभागात सन २०१९ ला मेरिटाईम बोर्डाने कोटयवधी रूपये खर्च करून ३०० वाहने पार्क होतील अशी भव्य वाहनतळ उभारले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जवळपास तीन वर्षे होऊन पार्किंग सुरू न झाल्यामुळे शासनाचे लाखो रूपयांचे नुकसान होत असून पर्यटकांना आपल्या गाडया रस्त्यावर बाहेर पार्किंग करत असल्यामुळे मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून शासनाचे होणारे लाखो रूपयाचे नुकसान टाळण्यासाठी तसेच अनधिकृत पार्किंगमुळे होणारी वाहतूक कोंडी दुर करण्यासाठी तातडीने मुरूड खोरा बंदर येथील पार्किंग सुरू करण्याबाबत कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (०१-११-२०२३) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) मुरुड खोरा ता. मुरुड जि.रायगड याठिकाणी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डामार्फत रु.२.४५ कोटी इतका निधी खर्च करुन ४३४१ चौ.मी. इतक्या क्षेत्रावर वाहनतळाचे बांधकाम माहे जून-२०२०मध्ये करण्यात आले आहे.
(३), (४) व (५) हे खरे नाही.
सन २०२१-२२ मध्ये कोव्हिड-१९ वरील प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा एक भाग म्हणून शासनाने मार्च २०२० पासून वेळोवेळी जाहीर केलेल्या लॉकडाऊनमुळे जवळपास सर्व व्यवहार ठप्प झाले होते. त्याअनुषंगाने, कोव्हिड-१९

महामारीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राच्या किनारपट्टीवर लहान बंदर हदीमध्ये चालणारी प्रवासी जलवाहतुक, जलक्रिडा प्रकल्प व नौकाविहार प्रकल्प बंद करण्यात आले होते.
सद्यस्थितीत, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने विकसित केलेल्या मुरूड येथील वाहनतळाची कार्यचालनाबाबत निविदा दि. ०१.०९.२०२३ रोजी वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे.
सदर प्रकरणी नियमानुसार प्राप्त निविदा धारकाची निवड करणे व त्यास संबंधित ठिकाण चालविण्यास देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**जिल्हा रुग्णालय,बीड येथील तत्कालिन जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या काळात झालेल्या अनियमिततेबाबत**

**(९) ५९६३८ (०२-०५-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हा रुग्णालय,बीड येथिल तत्कालिन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुर्यकांत गित्ते यांच्या काळात कोवीड-१९ साथरोग परिस्थती हाताळण्याठी रेमडीसीवर इंजक्शन वितरण, कंत्राटी कर्मचारी भरती व शासकीय निधीमध्ये आर्थिक अनियमितता झाली असल्याचे आयुक्त, आरोग्य सेवा, मुंबई. यांच्या पथकाच्या चौकशी अहवालात नमूद केले असून सर्व संबंधित दोषीवर शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी या पूर्वीही उपसंचालक, आरोग्य सेवा, लातूर व जिल्हा परिषद,बीड यांच्या लेख व वित्त विभागाच्या पथकाने वरील प्रकरणी चौकशी करून अनियमितता झाल्याचे स्पष्ट केले असुनही अद्याप संबंधित दोषीवर कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हा रुग्णालय,बीड येथे कोविड काळात झालेल्या भ्रष्टाचार व अनियमिततेबाबत आयुक्त, आरोग्य सेवा, मुंबई यांच्या पथकाच्या चौकशी अहवालानुसार तातडीने सर्वसंबंधीत दोषीवर कार्यवाही करणेबाबतची मागणी लोकप्रतिनिधी यांनी मा. आरोग्य मंत्री यांचाकडे दिनांक १९ डिसेंबर,२०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वरील प्रकरणी शासनाने चौकशी करून सर्व संबंधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (१२-१०-२०२३) :**(१) होय.
(२) नाही. सदर प्रकरणात सर्व अपचारींना दिनांक १२.०५.२०२३ रोजी विभागीय चौकशीचे ज्ञापन बजावण्यात आले आहे.
(३) होय.
(४) सदर प्रकरणात चौकशी सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रेमडेसिव्हिर इंजेक्शनच्या वायल्स मुदत बाहय ठरत असल्याबाबत**

**(१०) ६४५७६ (२८-०८-२०२३). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रेमडेसिव्हिर इंजेक्शनच्या २ लक्ष ४० हजार वायल्स ज्याची किंमत २३ कोटी १६ लक्ष रूपये असून सदर इंजेक्शन मुदत बाहय होत असल्याबाबतची माहिती दिनांक ४ एप्रिल,२०२३ रोजी वा त्यासुमारास स्टॉक रजिस्टरची प्रत विभागास मिळाल्याने निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर इंजेक्शन योग्य वेळेत उपयोगात आणण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२५-१०-२०२३) :** (१) हे खरे आहे.

रेमडेसिव्हिर इंजेक्शनच्या २ लक्ष ४० हजार व्हायल्स माहे एप्रिल, २०२३ अखेर मुदतबाह्य होत असल्याबाबत दिनांक ३ एप्रिल, २०२३ रोजी दैनिक वृत्तपत्रात बातमी प्रसिद्ध झाली होती.

(२) कोव्हिड-१९ च्या पहिल्या व दुसऱ्या लाटेत उद्भवलेल्या औषध साठयाच्या तुटवडयाचा विचार करता भविष्यात कमतरता भासू नये याकरिता पूर्वतयारी म्हणून आवश्यक साठा तयार ठेवण्याबाबत निर्देश प्राप्त झाले होते.त्यानुसार केंद्र शासनास अग्रेषित केलेल्या संभाव्य मागणीस अनुसरून राज्यासाठी रेमडेसिव्हिर इंजेक्शनचा साठा प्राप्त झाला तसेच बऱ्याच स्वयंसेवी संस्थांनी व्यावसायिक-सामाजिक बांधिलकी अंतर्गत रेमडेसिव्हिर इंजेक्शनचा आरोग्य संस्थांना मोफत पुरवठा केला होता. केंद्र शासनाने प्रस्तुत पुरवठा करताना आदेशात नमूद केले होते की, "सदरचा साठा पूर्वतयारीच्या अनुषंगाने देण्यात येत असून, कोणत्याही परिस्थितीत साठा परत घेतला जाणार नाही". तथापि, कोव्हिड-१९ च्या पहिल्या व दुसऱ्या लाटेच्या तुलनेने कमी रुग्ण बाधीत झाल्याने, या औषधाचा वापर खूप कमी प्रमाणात झाला. तसेच, या औषधाचा वापर इतर आजारावर करता येत नसल्याने, परिणामी राज्यातील आरोग्य संस्थांमध्ये रेमडेसिव्हिर इंजेक्शनचा साठा विनावापर पडून राहिला .

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात कामगार विमा योजनेंतर्गत कामगार रुग्णालय सुरु करणेबाबत**

**(११) ६४६०५ (२८-०८-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कामगारांना आरोग्यविषयक सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध करुन देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात कामगार विमा योजनेंतर्गत कामगार रुग्णालय सुरु करण्यास तत्वतः मान्यता दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच, राज्यातील कामगारांना भेडसावणा-या आरोग्याच्या समस्या सोडविण्यासंदर्भात शासनाने आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे व त्याची फलनिष्पत्ती काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रश्नी अद्याप कोणताही निर्णय घेतलेला नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (२३-११-२०२३) :**(१) अंशत: खरे आहे.

केंद्रशासनाच्या अधिपत्याखालील राज्य कामगार विमा महामंडळामार्फत राज्य कामगार विमा योजना राबविली जात असून, सदर योजनेअंतर्गंत नोंदणीकृत विमाधारक व लाभार्थी यांना राज्य शासनामार्फत वैद्यकीय सेवा पुरविली जाते.

राज्यात प्रत्येक जिल्ह्यात किमान एक राकावि रुग्णालय उभारण्यावर भर देण्याचे व त्यानुसार आवश्यक कार्यवाही करण्याचे मा.मंत्री (कामगार) तथा अध्यक्ष, प्रादेशिक मंडळ, राज्य कामगार विमा योजना यांनी दिनांक १२.०१.२०२३ च्या प्रादेशिक मंडळाच्या बैठकीत निर्देश दिलेले होते.

(२), (३) व (४) मा.मंत्री (कामगार) तथा अध्यक्ष, प्रादेशिक मंडळ, राज्य कामगार विमा योजना यांनी दिनांक १२.०१.२०२३ च्या प्रादेशिक मंडळाच्या बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार राकावि महामंडळाने पुढील कार्यवाही सुरु केलेली आहे.

राज्यातील कामगारांना आरोग्य विषयक सुविधा पुरविण्याकरीता सद्य:स्थितीत राज्य कामगार विमा योजनेची १५ कामगार रुग्णालये कार्यरत आहेत.

दरम्यानच्या कालावधीत, राज्याची निकड व योजनेचे निकष विचारात घेऊन मा.मंत्री, श्रम व रोजगार, भारत सरकार तथा अध्यक्ष, राज्य कामगार विमा महामंडळ, नवी दिल्ली यांनी राज्यात एकूण १७ नवीन कामगार रुग्णालय सुरु करण्यास तत्वत: मान्यता दिलेली असुन, सदरील कामगार रुग्णालये सुरु करण्याच्या दृष्टीने, राकावि महामंडळामार्फत भूसंपादन करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

### आरोग्य विभागाच्या नोकरभरतीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(१२) ६४६३९ (२८-०८-२०२३). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक आरोग्य विभागाने गट -क व ड श्रेणीतील विविध पदांच्या नोकरभरतीसाठी सन २०२१ मध्ये घेतलेल्या परिक्षांमध्ये पेपरफुटीमुळे परीक्षा आयोजनाची जबाबदारी असलेल्या न्यासा या खासगी कंपनीवर अद्याप कोणतीच फौजदारी कारवाई झालेली नसल्याचे माहे एप्रिल ,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने संपूर्ण निवडप्रक्रिया रद्द करण्याचा निर्णय दिनांक २९ जून, २०२२ रोजी वा त्या दरम्यान घेतला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुसार संबधित दोषी वर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (२३-११-२०२३) :**(१) प्राप्त अहवालानुसार हे खरे नाही.

पोलीस उप आयुक्त आर्थिक व सायबर गुन्हे, पुणे शहर यांचे दि.०६.०१.२०२३ रोजीच्या पत्राने गुन्हा क्र.५३/२०२१ व गुन्हा क्र.६०/२०२१ मध्ये मे.न्यास या कंपनीतील अधिकारी व कर्मचारींचा पेपर फुटी प्रकरणी सहभाग होता किंवा कसे तसेच अन्य व्यक्तींबाबत तपास फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १७३ (८) प्रमाणे चालू असल्याचे कळविले आहे.

(२)होय हे खरे आहे.

(३) होय,हे खरे आहे.

पेपर फुटी प्रकरणी दाखल गुन्हयात पोलिस तपास सुरू आहे आणि दोषी अधिकारी व कर्मचारी यांना निलंबित केले आहे.व विभागीय चौकशी सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील कामगारांना कामगार विमा रक्कम मिळत नसल्याबाबत

**(१३) ६५२७७ (२८-०८-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्रीमती सुमन पाटील (तासगाव-कवठेमहांकाळ), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कामगार रुग्णालयांची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत असताना कामगारांच्या वैद्यकीय विमा परताव्याच्या रक्कमाही वेळेवर उपलब्ध होत नाहीत तसेच त्यांचे प्रस्ताव नाकारले जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विमा योजनेअंतर्गत येणाऱ्या रुग्णालयासह ज्या कर्मचाऱ्यांनी आपत्कालीन परिस्थीतीमध्ये खाजगी रुग्णालयांमध्ये उपचार घेतले आहेत त्यांना देयकांचा परतावा वेळेत दिला जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विमाधारक कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती देयकास विलंब होण्यासाठी अनेक कारणे दिली जात असून त्यामागे आर्थिक गैरव्यवहार हे महत्वाचे कारण आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महाराष्ट्र राज्य विमाधारक कामगार संघटनेने कामगारांच्या न्याय व हक्कासाठी याविषयी शासनाकडे विचारणा केली असली तरी शासनाने त्यावर कोणतीच कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तदअनुषंगाने उक्त कामगारांच्या वैद्यकीय विमा परताव्याच्या रक्कमा वेळेत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२३-११-२०२३) :**(१) व (२) हे खरे नाही.

राज्य कामगार विमा योजना रुग्णालया मार्फत विमा रुग्णांना सेकंडरी मेडिकल केअर सुविधा पुरविण्यात येतात. ज्या सुविधा राकावियो रुग्णालयात उपलब्ध नाहीत, त्यासाठी महा-राकावि सोसायटीने खाजगी रुग्णालयांशी टाय-अप केलेले आहे, तर टेरीटेरी मेडिकल केअर साठी राकावि महामंडळाने खाजगी रुग्णालयांशी टाय-अप केलेले आहे, अशा रुग्णालयांतुन विमा रुग्णाने उपचार घेणे आवश्यक आहे. परंतु, काही विमारुग्ण तातडीच्या उपचाराची आवश्यकता नसताना सुध्दा राकावियो रुग्णालय किंवा टाय अप रुग्णालयांऐवजी खाजगी रुग्णालयात उपचार घेतात व त्याच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची मागणी करतात. अशा वैद्यकीय खर्च प्रतिपुर्ती प्रकरणी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि.१९.०३.२००५ च्या शासन निर्णया नुसार कार्यवाही केली जाते. या शासन निर्णयात नमूद २७ आकस्मिक व ५ गंभीर आजारांच्या यादीमध्ये समाविष्ट असलेल्या आजारावर एखाद्या विमा धारकाने खाजगी रुग्णालयामध्ये उपचार घेतलेले असतील व आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता केलेली असेल तर त्यांच्या उपचारावरील वैद्यकीय खर्चाचा परतावा तीन महिन्याच्या कालावधीत विमाधारकास अदा केला जातो.

वरील आजारा व्यतिरिक्त इतर आजारावर विमाधारकाने परस्पर खाजगी रुग्णालयामध्ये उपचार घेतलेले असल्यास व ते राकावि नियमामध्ये नमुद २७ आकस्मिक व ५ गंभीर आजारांच्या यादीतील नसल्यास असे प्रस्ताव नाकारले जातात.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही, अशा स्वरुपाचे महाराष्ट्र राज्य विमाधारक कामगार संघटनेचे पत्र शासनास प्राप्त झाल्याचे आढळून आलेले नाही.

(५) वैद्यकीय खर्च प्रतिपुर्ती संदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि.१९.०३.२००५ च्या शासन निर्णयानुसार विहीत २७ आकस्मिक व ५ गंभीर आजारांच्या यादीमध्ये समाविष्ट असलेल्या आजारांवर विमाधारकाने खाजगी रुग्णालयामध्ये उपचार घेतले असल्यास आणि वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती करीता नियमानुसार आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्यास, असे प्रस्ताव तीन महिन्याच्या कालावधीत निकाली काढण्यात येतात.

(६) प्रश्न उद्भवत नाही

---

**डेंग्यू आजाराची साथ आटोक्यात आणण्यासाठी करावयाच्या उपाययोजना**

**(१४) ६५३२८ (२८-०८-२०२३). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयात डेंग्यू या किटकजन्य आजारांचे रुग्ण वाढत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,

(२) तसेच,चिखली (जि बुलडाणा) तालुक्यात डेंग्यू आजाराचा प्रादूर्भाव वाढला असून येथील भालगाव गावातील काही रूग्ण तसेच यात एक गर्भवती महिलेचा सुद्धा मृत्यू झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, पुणे शहर आणि जिल्ह्यात देखिल डेंग्यूच्या साथीचा प्रादुर्भाव वाढत असून दिनांक १ जानेवारी, २०२३ ते दिनांक ३० जून, २०२३ अखेर किती लोकांना डेंग्यूची लागण झाल्याचे आढळून आले आणि त्यांच्यावर कोणत्या स्वरूपाचे वैद्यकीय उपचार करण्यात आले,

(४) असल्यास, डेंग्यू साथीचा आजाराचा प्रादुर्भाव होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(५) असल्यास, डेंग्यू आजाराची साथ आटोक्यात आणण्यासाठी प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यासह तसेच आवश्यक आरोग्यसुविधा उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,,
(६). नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२४-११-२०२३) :** (१) होय,
(२) होय,
३) पुणे शहर आणि जिल्हयात दिनांक १ जानेवारी, २०२३ ते ३० जुन, २०२३ या कालावधीत ५९ डेंगू दुषीत रुग्ण दिसून आले असून रुग्णांना लक्षणानुसार आवश्यक ते वैद्यकीय उपचार करण्यात आले आहे.
(४) या आजाराचा प्रादुर्भाव होण्याची कारणे :-
१) हा आजार डासांच्या वाढीसाठी पोषक असणाऱ्या माहे जून ते ऑक्टोबर या महिन्यांमध्ये वाढत असतो.
२) पाणी साठवून ठेवण्याच्या सवयीमुळे वाढ
३) दुषित रुग्ण तसेच दुषित डासांचे स्थलांतर
४) थांबून थांबून येणाऱ्या पावसामुळे ठिकठिकाणी पाणी साठून तयार होणारी डास्योत्पत्ती स्थाने
(५) साथ आटोक्यात आणण्यासाठी शासनाने खालील प्रमाणे उपाय योजना केलेल्या आहेत. :-
१) सर्वेक्षण :-
i) आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत घरोघरी नियमित ताप सर्वेक्षण.
ii) संशयित डेंग्यू रुग्णांचे रक्तजल नमुने जंतु परीक्षणासाठी पाठविणे., डेंग्यू दूषित आढळून आलेल्या रुग्णांना मोफत औषधोपचार करणे.
iii) उद्रेकाच्या ठिकाणी सर्व ताप रुग्णांचे तसेच सहवासित व परिसरातील लोकांचे जलद ताप सर्वेक्षण व कीटकशास्त्रीय सर्वेक्षण केले जाते.
२)किटक नियंत्रणासाठी करीत असलेल्या उपाय योजना :- किटकशास्त्रीय सर्वेक्षणांतर्गत आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत एडिस डासाच्या नियंत्रणासाठी रोज १०% घरामध्ये दैनंदिन किटकशास्त्रीय सर्वेक्षण केले जाते.
३)जीवशास्त्रीय उपाय योजनांतर्गत डासोत्पत्ती स्थानांमध्ये डास अळीभक्षक गप्पीमासे सोडण्यात येतात.
४)त्याचप्रमाणे ग्रामपंचायतीच्या सहयोगाने गटारे वाहती करणे, व्हेंट पाईपला जाळी बांधणे, पाणी साठू न देणे इ. उपाय योजना करण्यात येतात.
५) ग्रामपंचायत लोकप्रतिनिधी यांच्या सहयोगातून आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस पाळला जातो.
६) डास विरोधी क्रीम, अगरबत्ती, मॅट इ. चा वापर करुन डासांपासून सरंक्षण करणे, डासांपासून सरंक्षण करण्यासाठी मच्छरदाण्यांचा वापर करणे बाबत आरोग्य शिक्षण देण्यात येते.
७)जनजागृती :-
i) शालेय डेंग्यु जागृती मोहिम अंतर्गत शाळेतील मुलांना डास अळया ओळखण्याचे प्रशिक्षण देण्यात येते जेणेकरुन त्याचा उपयोग ते स्वत:च्या घरी डास अळी ओळखू शकतील.
ii) शालेय विद्यार्थी यांचे मार्फत गावात प्रभातफेरी काढून किटकजन्य आजार जनजागृती केली जाते.
iii) राज्यामध्ये १६ मे, २०२३ हा दिवस राष्ट्रीय डेंग्यू दिवस असूनही संपूर्ण महिनाभर हा कार्यक्रम राबविण्यात आला. तसेच संपूर्ण महिनाभर प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आल्या.
८)आरोग्य शिक्षण :- कार्यक्षेत्रातील जनतेस विविध माध्यमांद्वारे व प्रत्यक्ष भेटीमध्ये किटकजन्य आजाराचे कारण, प्रसाराचे कारण, डासोत्पत्ती, औषधोपचार, प्रतिबंधात्मक उपाय इ. बाबत आरोग्य शिक्षण दिले जाते.
९)डेंगी/चिकुनगुनिया/ई. आजाराच्या निदानासाठी राज्यात ४८ सेंटीनल सेंटर्स स्थापन केलेली आहेत.
१०) राज्यातील १३ मनपामध्ये पारेषण कालावधीसाठी ब्रीडिंग चेकर्स मंजूर केलेले आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खामगाव (जि.बुलढाणा ) येथील सामान्य रुग्णालयातील विविध संवर्गाची पदे रिक्त भरण्याबाबत.**

**(१५) ६५४७९ (२८-०८-२०२३). अ‍ॅड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगाव (जि.बुलढाणा ) येथील सामान्य रुग्णालयातील विविध संवर्गाची पदे रिक्त असल्याने येथील कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण येत असून त्यांना साप्ताहिक सुट्टी घेणे शक्य होत नसल्याचे माहे मे,२०२३ च्या शेवटच्या आठवडयात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे रुग्णांना आरोग्य सेवा मिळण्यास गेरसोयीचे होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,या रुग्णालयातील सर्व रिक्त पदे भरणे, रुग्णांना सर्व सोयी सुविधा पुरविणे आणि २०० खाटांचे रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करून ३०० खाटांचे करणे करिता सन २०१८ पासून शासनाकडे प्रलंबित असलेले प्रस्तावास मंजूरी मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२४-११-२०२३) :** (१) हे अशंत: खरे आहे.

सामान्य रुग्णालय, खामगाव येथे वैद्यकीय तसेच परावैद्यकीय पदे रिक्त आहेत. मात्र सदर पदे त्यांच्या अर्हतेनुसार राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कंत्राटी स्वरूपात भरण्यात आली असून त्याद्वारे रुग्णसेवा देण्यात येते.

(२) हे खरे नाही.

सामान्य रुग्णालय, खामगाव येथील उपलब्ध मनुष्यबळामार्फत रुग्णसेवा देण्यात येत आहे.

(३) सामान्य रुग्णालय, खामगाव याचे श्रेणीवर्धन व सर्व रिक्त पदे भरण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील महिलांच्या सुरक्षिततेसाठी "वन स्टॉप सेंटर" ची संख्या वाढविण्याबाबत**

**(१६) ६५५०६ (२३-०८-२०२३). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), अ‍ॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानसिक छळ किंवा संकटग्रस्त महिलांना मदत करण्यासाठी संस्थात्मक, मनोसामाजिक, कायदेशीर समुपदेशकांमार्फत साहाय्य करता यावे याकरिता खाजगी आणि सार्वजनिक अशा दोन्ही ठीकाणी एकाच छताखाली राज्यात जिल्हानिहाय "वन स्टॉप सेंटर" ही योजना सुरु करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाच्या महिला व बालविकास मंत्रालयाने माहे डिसेंबर,२०१७ मध्ये दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी एक, तर पुणे जिल्ह्यासाठी दोन अशी ३७ "वन स्टॉप सेंटर्स" सुरु करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात वाढत्या गुन्हेगारीचे प्रमाण लक्षात घेता "वन स्टॉप सेटर्स" ची संख्या वाढविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**कुमारी आदिती तटकरे (१२-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) केंद्र शासन पुरस्कृत "मिशन शक्ती" या एकछत्री योजनेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार सद्यस्थितीत राज्यात सर्व जिल्ह्यांमध्ये सुरु असलेले ३७ "वन स्टॉप सेंटर्स" आणि केंद्र शासनाच्या दि.१६.१२.२०२२ च्या पत्रान्वये मान्यता प्राप्त झालेल्या मुंबई उपनगर, औरंगाबाद, नाशिक, नागपूर व ठाणे या पाच जिल्ह्यांसाठी प्रत्येकी एक, अशी एकूण ४२ "वन स्टॉप सेंटर्स" सुरु करण्यास शासन निर्णय दि.१२.०५.२०२३ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**राज्यात महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेसाठी निधी वाढवून देण्याबाबत**

**(१७) ६५६९८ (२८-०८-२०२३). श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना शासनाने सुरु केली असून सन २०१२ पासून यात उपचारासाठी होत असलेल्या खर्चात वाढ करण्यात आलेली नाही , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औषधे, इतर साहित्य व शस्त्रक्रियेसाठी लागणारे सामुग्रीच्या दरात दिवसेंदिवस वाढ होत असून शासनाने त्याप्रमाणे वाढ न केल्यामुळे रुग्णालयास ही योजना राबविणे कठीण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेसाठी शासनाने निधी वाढवून देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१३-१०-२०२३) :**(१), (२) व (३) एकात्मिक महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत- जन आरोग्य योजनेमध्ये व्यापक सुधारणा करून सदर सुधारणासह योजना राज्यात राबविणेबाबत दि.२८.०७.२०२३ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सातारा येथील वैदयकीय महाविद्यालयाच्या इमारतीचे बांधकाम लवकर पूर्ण करण्याबाबत**

**(१८) ६५६९९ (२५-०८-२०२३). श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा येथील वैद्यकीय महाविद्यालयाच्या बांधकामावर आतापर्यंत किती खर्च करण्यात आलेला आहे तसेच सदर काम संथगतीने सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीच्या बांधकामाची प्रगती व सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, या इमारतीचे बांधकाम लवकर पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (२७-१०-२०२३) :** (१) नाही. तथापि, संस्थेचे सदर बांधकाम प्रगतीपथावर असून ऑगस्ट, २०२३ अखेर रुपये ४९.०७ कोटी इतका खर्च झालेला आहे.

(२)

| अ.क्र. | बाब | कामाची टक्केवारी | सद्यस्थिती |
|---|---|---|---|
| १ | वर्ग-१ इमारत | ७०% | RCC, विटबांधकाम |
| २ | वर्ग-२ इमारत | ३२% | तिसरा स्लॅब |
| ३ | वर्ग-३ इमारात | ३५% | पाचवा स्लॅब |
| ४ | वर्ग-४ इमारत(२Nos) | ८६% | RCC, विटबांधकाम |
| ५ | स्वयंपाक गृह भोजन कक्ष | ५२% | RCC, विटबांधकाम |
| ६ | वसतीगृह इमारत | ३६% | तिसरा स्लॅब |
| ७ | महाविद्यालय इमारत | २७% | Footing, Plinth beam, तळमजला Column |
| ८ | रुग्णालय इमारत | १३% | खोदकाम, भाग-१,३,४,५,७ Footing पुर्ण |
| ९ | संरक्षक भिंत, Roads | ४८% | RCC, विटबांधकाम |
| १० | Electrification | ३% | ----- |

(३) सदर बांधकाम विहित कालावधीत पुर्ण करण्यात येईल. त्यासाठी सतत आढावा बैठक घेण्यात येतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कराड (जि.सातारा) तालुक्यातील स्व.सौ.वेणूताई चव्हाण उपजिल्हा रुग्णालयातील अधिक्षकाचे पद भरण्याबाबत**

**(१९) ६५७०६ (२८-०८-२०२३). श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कराड (जि.सातारा) तालुक्यातील स्व.सौ.वेणूताई चव्हाण उपजिल्हा रुग्णालयात कराडसह पाटण, कडेगाव तालुक्यातील हजारो रुग्ण येथे उपचारासाठी येतात तसेच येथे शवविच्छेदनाचे प्रमाण देखील वाढलेले असून या रुग्णालयात गेल्या ११ महिन्यापासून अधिक्षकाचे पद रिक्त आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, या रुग्णालयात रिक्त असलेले अधिक्षकाचे पद त्वरीत भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२६-१०-२०२३) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.
स्व. सौ. वेणुताई चव्हाण उपजिल्हा रुग्णालय कराड येथे शवविच्छेदनाचे पाटण, इस्लामपूर, कडेगाव येथून रुग्ण उपचारासाठी रुग्णालयात येत असल्याने, रुग्णसंख्या व शवविच्छेदन संख्या वाढलेली आहे. उपजिल्हा रुग्णालय कराड येथील वैद्यकिय अधिक्षक हे नियत वयोमानाने सेवा निवृत्त झाले असल्याने सदरचे पद रिक्त आहे.
(३) पद भरतीची कार्यवाही चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जीवन अमृत (ब्लड ऑन कॉल) या योजने अंतर्गत काम करण्या-या कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय आरोग्य योजना वा अन्य योजनेत सामावून घेण्याबाबत**

**(२०) ६५७६९ (२८-०८-२०२३). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जीवन अमृत रक्त पेढी (ब्लड ऑन कॉल) ही सन २०१३ पासून सुरु असलेली सेवा दिनांक ३१ मार्च, २०२३ रोजी वा त्यासूमारास कायमस्वरुपी बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेअंतर्गत आठ ते नऊ वर्षांपासून काम करणाऱ्या १४ कर्मचाऱ्यांनी सदर सेवा बंद करण्यांत आल्यामुळे राष्ट्रीय आरोग्य योजनेत किंवा तत्सम इतर कोणत्याही योजनेअंतर्गत सेवेत सामावून घ्यावे या मागणीकरितां दिनांक ३० एप्रिल,२०२३ रोजी मंत्रालयासमोर आत्महत्या करण्याचा इशारा शासनास दिला असल्याचे दिनांक १८ एप्रिल,२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या रक्त केंद्रांना प्रशिक्षण व दीर्घ अनुभवी कर्मचाऱ्यांची आवश्यकता असल्याबाबत सर्व जिल्हयांचे अधिष्ठाता (डीन) तसेंच शल्यचिकित्सक (सिव्हील सर्जन) यांनी शासनास यापूर्वी कळविल्यामुळे शासनाने त्यासाठी स्थापन केलेल्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त होऊनही त्याबाबत अद्यापही कार्यवाही केली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर समितीचा अहवाल प्राप्त होऊनही तसेंच अनुभवी कर्मचाऱ्यांची आवश्यकता असतांना देखील शासनाने त्याबाबत कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत,
(५) तसेंच,सदर कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय आरोग्य योजना वा अन्य योजनेत सामावून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१३-१०-२०२३) :** (१) होय.
सदर योजनेस अल्पसा प्रतिसाद होता म्हणून सदरची योजना दिनांक ३१.०३.२०२२ पासून बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.
(२) होय.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्हयातील आशा स्वयंसेविकांवर केलेल्या कारवाईबाबत**

**(२१) ६५९१७ (२८-०८-२०२३). श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१)पुणे जिल्हयातील ६२आशा स्वयंसेविका या शहरी आणि ग्रामीण भागांत इतर पदांवर काम करीत असल्यामुळे प्रशासनाने त्यांच्यावर कारवाई करण्याच्या सुचना दिल्या आहेत, हे खरे आहे काय ,
(२)असल्यास, कोविड-१९ काळात कॉन्टक्ट ट्रेसिंग,लसीकरणा करणे यासाठी आशा स्वंयसेविकांची भूमिका महत्वाची राहिलेली असल्याने सदरील आशा स्वयंसंविकांना समज देऊन कारवाई मागे घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, त्यामागील कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२०-१०-२०२३) :** (१) हे खरे आहे.
दिनांक २५.०३.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कार्यवाही करण्यात आली आहे.
(२) पुणे जिल्हयातील ६२ आशा स्वयंसेविका, या एकाच वेळी दोन पदांवर काम करतांना आढळून आल्या होत्या. त्यापैकी २५ आशा स्वयंसेविकांनी स्वईच्छेने आशा पदाचा राजीनामा दिलेला आहे. उर्वरित ३७ आशा स्वयंसेविकांनी इतर ठिकाणी काम करणाऱ्या पदाचा राजीनामा देऊन फक्त आशा स्वयंसेविकांचे काम स्विकारलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील रक्तपेढयामध्ये रक्त साठा कमी तसेच रक्तपेढयांच्या रक्ताचे दर वाढविल्याबाबत**

**(२२) ६६२४६ (२८-०८-२०२३). श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईसह राज्यातील विविध रक्तपेढयांमध्ये रक्त साठा कमी असून उन्हाळा कडक असल्याने रक्ताची मोठया प्रमाणात गरज भासण्याची शक्यता असून सध्या उपलब्ध असलेले रक्त ११ ते १२ दिवस पुरण्याची शक्यता असल्याचे दिनांक २१ एप्रिल,२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रक्ताचा मोठया प्रमाणात साठा करुन ठेवता येत नसल्याने त्या ऐवजी टप्प्या टप्प्याने रक्त संकलीत करावे लागते, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, राज्यात ३३६ रक्तपेढया असून दररोज ४ ते ५ हजार युनिट रक्ताची गरज भासत असून सार्वजनिक आरोग्य विभागाने नुकतेच रक्ताचे नवे दर जाहीर केले असून यामध्ये शासनाने १०० ते ३५० रुपयांपर्यंतची वाढ केली असून रक्तपेढयांमध्ये रक्तावर दिले जाणारे अनुदानही काढून घेण्यात आले असल्याचे दिनांक ३१ मार्च,२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, गरजू व गरीब रुग्णांना तात्काळ नियमित व पूर्वीच्या प्रचलित दराने रक्त पुरवठा होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (३०-१०-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

दिनांक २१.०४.२०२३ रोजी राज्यामध्ये एकूण ५३,१६२ युनीट तर मुंबईत ५,४९४ युनीट इतका रक्त साठा उपलब्ध होता. मुंबईची साधारणत: दैनिक रक्ताची गरज ९०० ते १२०० युनीट एवढी आहे. उपलब्ध रक्त साधारणपणे ५ दिवस पुरु शकते. तथापि, रक्ताचा उपयोग व स्वैच्छिक रक्तदानाद्वारे रक्ताची भरपाई होणे ही श्रृंखला सतत सुरु असते.

(२) हे खरे आहे.

रक्त संकलनानंतर रक्ताचा वापर ३५ ते ४२ दिवसांच्या आत करणे अनिवार्य असल्यामुळे स्वैच्छिक रक्तदान शिबीरे टप्प्याटप्प्याने आयोजित करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) हे खरे नाही.

सद्यस्थितीत राज्यात ३७१ रक्तकेंद्र आहेत. राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषद, नवी दिल्ली यांचे मार्फत शासकीय व अशासकीय रक्तकेंद्राचे रक्त व रक्तघटक यांचे प्रक्रिया शुल्क निश्चित करण्यात येते. राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषदेने दिनांक १४.०६.२०२२ पासून सध्याच्या प्रक्रिया शुल्कात बदल करुन शासकीय रक्तकेंद्रासाठी प्रक्रिया शुल्क रु. ५०/- प्रती बॅग व अशासकीय रक्तकेंद्रासाठी रु. १००/- प्रती बॅग अशी वाढ केलेली आहे. रक्तकेंद्रांचे कोणतेही अनुदान काढून घेण्यात आलेले नाही.

(४) राज्यातील रक्त संकलन हे पुरेसे आहे. तसेच शासकीय रुग्णालयात दाखल केलेल्या रुग्णांना मोफत रक्त पुरवठा करण्यात येतो.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बोगस डॉक्टरावर कारवाई करणेबाबत

**(२३) ६६३५५ (२८-०८-२०२३). श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधारी (ता.सिल्लोड,जि छत्रपती संभाजीनगर) येथील आरोग्य केंद्रवर बी.ए.एम.एस. बोगस पदवीधारक डॉक्टरची जिल्हा परिषदेत कंत्राटी पध्दतीवर वैद्यकीय अधिकारी या पदावर नियुक्ती केली असून सदर डॉक्टरने १८ लाख रुपये वेतन घेतल्या प्रकरणी सीटी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे दिनांक २१ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय?

(२) तसेच, छत्रपती संभाजीनगर जिल्हयात खोटया कागदपत्रांच्या आधारे कंत्राटी वैद्यकीय अधिकारी पदावर कार्यरत असणाऱ्या एका बोगस डॉक्टरांवर काही दिवसापूर्वी आरोग्य विभागाने कारवाई करत निलंबन केले असून या प्रकरणी आरोग्य अधिकारी यांनी या बोगस डॉक्टरांविरुद्ध वेदांतनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल असल्याचे दिनांक ७ मे,२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार बोगस डॉक्टरावर कारवाई करणेसह असे प्रकार रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (२६-१०-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) दि. १८.०४.२०२३ रोजी सिटी पोलीस स्टेशन मध्ये एफ.आर.आय. दाखल करण्यात आले आहे.

(३) संबंधित कंत्राटी वैद्यकीय अधिकाऱ्यावर सेवा समाप्तीची कारवाई करण्यात आलेली असून त्यांच्याविरूद्ध सिटी चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात बरेच रुग्ण यकृताच्या प्रतीक्षेत असल्याबाबत**

**(२४) ६६४६९ (२८-०८-२०२३). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गेल्या एका वर्षात केवळ ९० यकृतांचे दान झाले असून ४१४५ रुग्ण यकृताच्या प्रतीक्षेत असल्याचे माहे एप्रिल,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले ,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या रुग्णांचे मेंदू मृत झाले अश्या रुग्णांनी यकृत दान करावे याबाबत जनजागृती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१३-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही.

राज्यात मागील एक वर्षात ९० यकृताचे दान झालेले नसून २८९ यकृताचे दान झालेले आहे व ४१४५ रुग्ण यकृताच्या प्रतिक्षेत नसून ११८५ रुग्ण प्रतिक्षेत आहेत.

(२) अवयव दानाबाबत जनतेमध्ये जनजागृती करण्याकरीता माहिती व जनसंपर्क कार्यालय पुणे व रिजनल ऑर्गन ॲन्ड टिश्यु ऑर्गनायझेशन के.ई.एम. हॉस्पीटल, परेल, मुंबई, राज्यातील प्रत्यारोपन समन्वय केंद्रे मुंबई, पुणे औरंगाबाद व नागपूर तसेच एनजीओ यांचे मार्फत पथ नाट्य, बॅनर्स, पोस्टर्स सिनेमागृहांमध्ये जाहिराती, रेडीओ जिंगल्स, लघुचित्रफिती दाखविणे तसेच चर्चासत्रे कार्यक्रम राबविण्यात येत असतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर कार्यरत असलेल्या अंशकालीन महिला परिचारिकांना कामगार कायद्यानुसार किमान वेतन व इतर मागण्या लागू करण्याबाबत**

**(२५) ६६५६१ (२८-०८-२०२३). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.सुभाष धोटे (राजूरा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत असलेल्या १०,६७३ अंशकालीन महिला परिचारिकांना कामगार कायद्यानुसार किमान वेतन लागू करून वेतन देण्याची तसेच इतर विविध मुख्य मागण्या पूर्ण करण्यासाठी महिला पारिचारिकांनी संघटनेच्या नेतृत्वाखाली दिनांक २ मे, २०२३ पासून आझाद मैदानात आंदोलन सुरू केले असल्याबाबत मा. मुख्यमंत्री, मा. (सार्वजनिक आरोग्य) मंत्री,तसेच संचालक, आरोग्य सेवा संचालनालय यांना `समर्थन' संस्थेने दिनांक १० मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे निदर्शनास आणून दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अंशकालीन महिला परिचारिकांना कामगार कायद्यानुसार किमान वेतन व इतर मागण्या लागू करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत आणि सदरचा निर्णय किती कालावधित घेतला जाईल?

**डॉ. तानाजी सावंत (१३-१०-२०२३) :** (१) हे अशंत: खरे आहे.

राज्यात एकूण १९०६ प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत १०७४० उपकेंद्र कार्यरत आहेत. प्रत्येक उपकेंद्राला एक अशंकालीन स्त्री परिचर हे पद मंजूर आहे. महाराष्ट्र राज्य महिला जिल्हा परिषद महिला महासंघाच्या वतीने आरोग्य उपकेंद्रातील अशंकालीन स्त्री परिचर यांच्या मागण्याबाबत माहे मे, २०२३ महिन्यात आझाद मैदान येथे बेमुदत तीव्र साखळी उपोषण पुकारलेले होते.

(२) १.महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत राज्यातील सर्व नागरिकांना आरोग्य विमा प्राप्त झाले आहे त्यामुळे अंशकालीन स्त्री परिचरांना आरोग्य विमा अनुज्ञेय ठरते.

२.अंशकालीन स्त्री परिचर ह्या नियमित शासकीय कर्मचारी नसल्याने शासकीय कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय सवलतीस त्या पात्र नाही.

३.अशंकालीन स्त्री परिचरांच्या रू.६,०००/-मानधन करण्याबाबतचा प्रस्ताव मा.मंत्रीमंडळाच्या मान्यतेस्तव सादर विभागाकडून करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्रात सर्वधिक उष्माघाताच्या रुग्णांची नोंद झाल्याबाबत**

**(२६) ६६६०४ (२८-०८-२०२३). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१५ नंतर सर्वधिक उष्माघाताच्या रुग्णांची नोंद या उन्हाळयात झाली असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे ,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १ मार्च ते १२ एप्रिल,२०२३ या दरम्यान मुंबई उपनगरात उष्माघाताचे संशयित ७२ रुग्णांची नोंद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईसह महाराष्ट्रात वाढत्या उष्माघाताचे प्रमाण लक्षात घेता शासन स्तरावर याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (१३-१०-२०२३) :** (१) होय.

(२) होय.

(३) राज्यस्तरावर सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार पुढील प्रमाणे उष्माघात प्रतिबंधात्मक / नियंत्रणात्मक उपाय योजना करण्यात आल्या आहेत.

• उष्माघात / उष्णता विकाराबाबत सर्वेक्षण आणि अहवाल सादर करण्याबाबत जिल्हा नोडल अधिकारी, निवासी वैद्यकीय अधिकारी (बाह्य संपर्क), जिल्हा साथरोग तज्ज्ञ यांचे प्रशिक्षण घेण्यात आले.

• जिल्हा स्तरावर उष्माघात क्लिनिकल व्यवस्थापन आणि सर्वेक्षणाबाबत वैद्यकीय अधिकारी यांचे उष्माघात आणि उष्णता विकारचे प्रशिक्षण देण्यात आले.

• सर्व जिल्हा, महानगरपालिका, नगरपालिका यांच्या अखत्यारित येणाऱ्या सर्व आरोग्य संस्थांमध्ये उष्णतेशी संबंधीत आजारांच्या व्यवस्थापनासाठी उष्माघात उपचार कक्ष स्थापन करण्यात आले.

• विविध माध्यमातून उष्णतेपासून बचाव करण्यासाठी जनतेला माहिती देण्यात आली. उदा. पुरेसे पाणी पिणे, प्रवासात सोबत पाणी ठेवणे, हलक्या वजनाचे, फिकट रंगाचे, सैलसर कपडे वापरावेत. तसेच उष्माघाताचा त्रास होऊ लागल्यास नजिकच्या रुग्णालयात तात्काळ जावे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात महाराष्ट्र मेडिकल काऊन्सिलच्या निवडणूका घेणेबाबत

**(२७) ६६८८३ (२५-०८-२०२३). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अतुल बेनके (जुन्नर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात महाराष्ट्र मेडिकल काऊन्सिलची मुदत माहे ऑगस्ट,२०२२ च्या पहिल्या आठवडयात वा त्यादरम्यान संपल्यानंतरही शासनाने निवडणुका घेतलेल्या नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे डॉक्टरांच्या नोंदणीसह रुग्ण हक्काशी संबंधित अनेक बाबी प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेतली आहे काय, त्यानुसार डॉक्टरांच्या नोंदणीसह रुग्णहक्काशी संबंधित अनेक प्रलंबित प्रश्न सोडविण्याच्यादृष्टीने महाराष्ट्र मेडिकल कौन्सीलच्या निवडणूका तातडीने घेण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (१३-१०-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) महाराष्ट्र वैद्यकीय परिषद नियम १९६७ मधील निवडणूक नियमांमध्ये सुधारणा करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील महिला व बालसहाय्यता कक्ष (समुपदेशन केंद्र) मधील समुपदेशक यांना वेतनश्रेणी लागू करणेबाबत

**(२८) ६७०६३ (२३-०८-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात महिला व बालविकास विभागातर्फे पोलीस स्टेशनच्या आवारात मान्यताप्राप्त महिला व बालसहाय्यता कक्ष (समुपदेशन केंद्र ) संपूर्ण महाराष्ट्रात कार्यरत असून सदर कक्ष स्थापनेची सुरुवात सन- १९८४ पासून झालेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कक्ष कार्यालयात कार्यरत समुपदेशक हे अत्यल्प मानधनावर काम करत असून त्यांना दिनांक २७ मार्च,२०१७ रोजी उपायुक्त, महिला व बालविकास आयुक्तालय, पुणे यांनी त्यांना वेतनश्रेणी लागू करण्यात आली असल्याचे परिपत्रक काढले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर परिपत्रकानुसार त्वरित निर्णय घेऊन समुपदेशकांना वेतनश्रेणी लागू करणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. महिला व बालविकास मंत्री यांचे कडे दिनांक १७ फेब्रुवारी,२०२३ रोजी वा त्यासुमारस निवेदनाद्वारे केली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार पोलीस स्टेशनच्या आवारातील मान्यताप्राप्त महिला व बालसहाय्यता कक्षातील समुपदेशकांच्या वेतनश्रेणी संदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (१८-१०-२०२३) :**(१) होय.
(२) राज्यात महिला व बालकांवर होणाऱ्या अत्याचारास आळा घालण्याकरिता स्थापन करण्यात आलेल्या समुपदेशन केंद्रातील समुपदेशक व समन्वयक यांना दि.१९.११.२०१३ रोजीच्या शासन निर्णयानुसार मानधन देण्यात येते. उपायुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांनी समुपदेशक यांना वेतनश्रेणी लागू करण्याचे परिपत्रक काढले होते ही बाब खरी नाही.
(३) व (४) महिला व बालकांवर होणाऱ्या अत्याचारास आळा घालण्यासाठी पोलिस स्टेशनच्या आवारात स्थापन करण्यात आलेल्या समुपदेशन केंद्रातील समुपदेशकांचे मानधन वाढविणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(५ ) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात कोरोना , इन्फ्लुएंझा रुग्णांची संख्या वाढत असल्याबाबत**

**(२१) ६७०८३ (२८-०८-२०२३). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात "एक्सबीबी १.१६ " या कोरोनाच्या नव्या उपप्रकार व इन्फ्लुएंझा रुग्णांची संख्या दिवसेदिवस वाढत असून मुंबईतही कोरोना रुग्णसंख्येत पून्हा वाढ होत असल्याचे माहे मार्च, २०२३ च्या शेवटच्या आठवडयात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,
(२)असल्यास, त्यामुळे सहआजार असलेले व्यक्ती जेष्ठ नागरिक, गर्भवती महिला आणि लहान मुले यांना संसर्गाचा अधिक धोका वाढलेला आहे, हे ही खरे आहे काय ,
(३)असल्यास, कोरोनामुळे ६२ हून अधिक जणांचा दुर्देवी मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय ,
(४)असल्यास, शासनाने या प्रकरणी आढावा घेवून रुग्णवाढ आटोक्यात आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१३-१०-२०२३) :**(१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४) राज्यात एक्सबीबी व इतर सर्व व्हेरियंटच्या पार्श्वभूमीवर कोविड प्रतिबंध आणि नियंत्रणासाठी पुढील उपाययोजना करण्यात येत आहेत.
• आय.एल.आय. आणि सारी रुग्णांचे नियमित सर्वेक्षण करण्यात आले.
• रोग निदानासाठी प्रयोगशाळा उपलब्ध आहेत.
• रुग्णोपचारासाठी पुरेशी रुग्णालयीन व्यवस्था केली होती.
• कोविड विषाणूच्या जनुकीय क्रम निर्धारणासाठी राज्यात ९ प्रयोगशाळा कार्यरत आहेत. त्याद्वारे जनुकीय क्रम निर्धारण करण्यात आले.
• नवीन व्हेरियंट आढळलेल्या रुग्णांचा साथरोग शास्त्रीय अभ्यास आणि त्यानुसार कार्ययोजना करण्यात येते.
• कोविड प्रतिबंधक लसीकरण करण्यात आले आहे.
• कोविड प्रतिबंधासाठी आरोग्य शिक्षण आणि लोक प्रबोधन करण्यात आले आणि ते निरंतर चालू आहे.
• आंतरराष्ट्रीय प्रवाशांचे सर्वेक्षण करण्यात आले. प्रवाशांचे थर्मल स्क्रिनिंग केले जाते. २% आंतरराष्ट्रीय प्रवाशांचे आरटीपीसीआर चाचणीसाठी नमुने घेण्यात आले.

• रुग्णालयातील उपलब्ध बेड्स, व्हेन्टीलेटर्स, ऑक्सीजन बेड्स, आयसीयु बेड्स, ॲम्बुलन्स ऑक्सिजन प्लान्टची सद्यस्थिती, टेलिमेडीसिन सुविधा, उपलब्ध मनुष्यबळ आणि त्यांचे प्रशिक्षण इ. सर्व बाबीसह राज्यातील रुग्णालयांचा नियमित आढावा घेण्यात आला.

• भविष्यात कोरोनाची साथ आल्यास पुर्वतयारी म्हणून कोरोना रुग्णांना तात्काळ उपचार मिळण्यासाठी केंद्र शासनाच्या सुचनेनुसार द्वितीय आणि तृतीय स्तरावरील आरोग्य संस्थांमधील बेड्स, व्हेन्टीलेटर्स, ऑक्सिजन बेड्स, आयसीयु बेड्स, ॲम्बुलन्स, ऑक्सिजन प्लान्टची सद्यस्थिती, औषधांची उपलब्धता इ. बाबत मॉकड्रील घेण्यात आले आहे. अशाप्रकारे विविध उपाययोजनांमुळे कोरोनाची रुग्णसंख्या आटोक्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### शासकीय आणि खासगी क्षेत्रात नोकरी साठी कोविड लस अनिवार्य करण्याची अट शिथिल करण्याबाबत

**(३०) ६७३७९ (२५-०८-२०२३). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोविड हा संसर्गजन्य आजार नियंत्रणात आणण्यासाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शनाखाली सर्वांना कोविड नियंत्रक लस देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय आणि खासगी क्षेत्रात नोकरी साठी कोविड लस घेतल्याचे प्रमाण पत्र अनिवार्य केलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोविड हा आजार आटोक्यात आला असला तरी राज्यांतील १००% नागरिकांना कोविड लस देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास ,अनेकांनी लस घेतलेली नसल्याने त्यांना नोकरी मिळण्यास अडचणी येत असल्यामुळे शेकडो जण रोजगारापासुन वंचीत राहत आहेत ,हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, कोरोना लस ऊपलब्ध करून देण्याबाबत किंवा नोकरीसाठी लस घेतल्याचे प्रमाणपत्राची अट शिथिल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (२३-११-२०२३) :**(१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) कोविड-१९ आजाराच्या संसर्गाचे प्रमाण कमी झाल्याने व नागरिकांमध्ये भिती कमी झाल्यामुळे लस घेण्याबाबत उदासिनता दिसून येत असल्याने १००% नागरिकांनी लस घेतलेली नाही. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार लसीकरण ऐच्छिक (voluntary) असल्याने शासकीय किंवा खाजगी नोकरीसाठी लस घेण्याचे प्रमाणपत्र अनिवार्य करण्याबाबत या विभागाकडून कोणत्याही सूचना निर्गमित करण्यात आलेल्या नाहीत.

(५)व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात कुष्ठरोगाचे रुग्ण आढळले असल्याबाबत

**(३१) ६७५७३ (२५-०८-२०२३). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कुष्ठरोगाचे १७००० रुग्ण आढळले असल्याचे दिनांक १८ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय ,

(२)असल्यास, देशात सन २०२१-२०२२ या वर्षात ७५,३९४ कुष्ठरुग्ण आढळले असून त्यात सर्वाधिक रुग्ण महाराष्ट्रातील आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कुष्ठरोग निमूर्लनाबाबत शासन राबवित असलेल्या उपाययोजनाचे थोडक्यात स्वरूप काय आहे?

**डॉ. तानाजी सावंत (२४-११-२०२३) :** (१) होय

(२) होय

सन २०२१-२२ मध्ये राज्यात १४५२० कुष्ठरुग्ण आढळले आहेत.

(३) राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रमांतर्गत केंद्र सरकारने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचना व राज्य स्तरावरील नाविण्यपूर्ण योजनेच्या माध्यमातून समाजातील सर्व कुष्ठरुग्ण लवकरात लवकर शोधून त्यांना त्वरित औषधोपचाराखाली आणले जाते. कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तर व जिल्हा स्तरावरुन कार्यक्षेत्रामध्ये नियमितपणे संनियंत्रण केले जाते.

उपाययोजना :-

• विविध माध्यमांद्वारे जनसामान्यांपर्यंत कुष्ठरोगाबाबतची शास्त्रोक्त माहिती देवून कुष्ठरोगाच्या तपासणीसाठी स्वत:हून पुढे येण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

• दरवर्षी महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्त दिनांक ३० जानेवारी रोजी स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान राबविण्यात येते. याद्वारे प्रत्येक गावात कुष्ठरोगाबाबत व्यापक जनजागृती करण्यात येते.

• शहरी भागात अवैद्यकीय सहाय्यक व ग्रामीण भागात आरोग्य कर्मचारी, आशा यांच्या मार्फत संशयिंत रुग्ण शोधण्यात येतात. निदान निश्चिती झाल्यानंतर त्वरीत बहुविध औषधोपचार दिला जातो.

• नवीन शोधलेल्या कुष्ठरुग्णांच्या सर्व सहवासितांची तपासणी केली जाते. सहवासितांमध्ये कुष्ठरोगाचा प्रसार होऊ नये म्हणून या सर्व पात्र सहवासितांना रिफाम्पीसीन या गोळीची एक मात्रा दिली जाते.

• शाळेतील विद्यार्थ्यांना कुष्ठरोगविषयक आरोग्य शिक्षण दिले व त्यांची कुष्ठरोग संशयितांची तपासणी केली जाते.

• सन २०१६-१७ पासून दरवर्षी राज्यात "कुष्ठरुग्ण शोध मोहिम" राबविण्यात आली. या मोहिमेमध्ये आढळून आलेल्या कुष्ठरुग्णांना मोफत बहुविध औषधोपचार देण्यात आला आहे.

• सन २०२०-२१ व २०२१-२२ मध्ये सक्रीय कुष्ठरुग्ण शोध व नियमित संनियंत्रण ही कृती राबविण्यात आली. सदर कृतीमध्ये अती जोखमीच्या भागात सर्वेक्षणाच्या २ फेऱ्या व कमी जोखमीच्या भागात सर्वेक्षणाची १ फेरी राबविण्यात आली व आढळून आलेल्या कुष्ठरुग्णांना मोफत बहुविध औषधोपचार त्वरीत सुरु करण्यात आला.

• शुन्य कुष्ठरुग्ण असणाऱ्या २२९१६ गावामध्ये कुष्ठरोग कार्यक्रमात असणाऱ्या प्रशिक्षित कर्मचाऱ्यांकडून सर्वेक्षण व त्वरीत संशयित तपासणी करुन आढळून आलेल्या ७९३ कुष्ठरुग्णांना बहुविध औषधोपचार सुरु करण्यात आला आहे.

• कुष्ठरोग तपासणी पासून वंचित असण्याची शक्यता असल्यामुळे जोखमीचा घटक असलेल्या खाणकामगार, कारागृहातील व्यक्ती, आश्रमशाळा, वीटभट्टी कामगार, बांधकाम कामगार, विस्थापित लोकसंख्या इ. यासारख्या जोखमीच्या भागातील लोकसंख्येचे "कुसुम" कार्यक्रमांतर्गत कुष्ठरोग कार्यक्रमातील प्रशिक्षित कर्मचाऱ्यांमार्फत सर्वेक्षण करण्यात आले व त्यामध्ये ८४९ नवीन कुष्ठरुग्ण शोधून त्यांना तात्काळ औषधोपचार सुरु करण्यात आला आहे.

• हयात असलेल्या सर्व नव्या व जुन्या कुष्ठरुग्णांच्या घरी भेट देवून कुष्ठरोग कार्यक्रमातील प्रशिक्षित कर्मचाऱ्यांमार्फत सहवासितांची तपासणी माहे सप्टेंबर, २०२३ पासून करण्यात आली असून आढळलेल्या २६३ नवीन कुष्ठरुग्णांना त्वरीत औषधोपचार सुरु करण्यात आला आहे.

---

### अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयातील प्रथमश्रेणी वैद्यकीय अधिका-यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(३२) ६७६०९ (२८-०८-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक**

**आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयात प्रथमश्रेणी वैद्यकीय अधिका-यांची सहा पदे मंजूर असून प्रत्यक्षात येथे एकच पदे भरले असून उर्वरीत पाच पदे रिक्त असून त्यापैकी स्त्रीरोगतज्ञ तसेच बालरोगतज्ञ हे दोन्ही पेद रिक्त असल्याची माहिती रुग्णालयाच्या प्रशासनाने माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान दिली आहे, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, उक्त रिक्त पदामुळे रुग्णालयाच्या कामकाजावर परिणाम होत असल्याने सदर रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२६-१०-२०२३) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
जिल्हा स्त्री रुग्णालय, अमरावती येथे (S-२३) संवर्गातील ५ मंजूर पदे असून स्त्रीरोगतज्ञ व बधिरीकरण तज्ञ या संवर्गातील २ पदे रिक्त आहेत.
(२) रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शासकीय रुग्णालयांची संख्या तसेच खाटांचह संख्या वाढविणेसह रिक्त पद भरणेबाबत**

**(३३) ६७८३५ (२८-०८-२०२३). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.माधवराव पवार (हदगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जागतिक आरोग्य मानांकानुसार प्रत्येक ४० नागरिकांमागे एक रुग्ण खाट उपलब्ध असणे आवश्यक असताना राज्यात प्रत्यक्षात ४ हजार २६४ रुग्णांच्या मागे एक खाट उपलब्ध असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, जिल्हा परिषद कर्मचारी वगळता सार्वजनिक आरोग्य सेवेसाठी आवश्यक असणाऱ्या वर्गनिहाय ६८,०१७ मंजूर पदांपैकी केवळ ४८,९१५ पदेच भरण्यात आली असून १९,१०२ पदे म्हणजे मंजूर पदांच्या २८.०८ टक्के पदे रिक्तच आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन शासकीय रुग्णालयांची संख्या वाढविणे तेथे रुग्णांसाठी अधिकाधिक खाटा उपलब्ध करुन देणेसह रिक्त पद तात्काळ भरणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (०६-०९-२०२३) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
लोकप्रतिनिधी तसेच इतर मान्यवरांकडून मागणी करण्यात आल्यानुसार तसेच वाढत्या लोकसंख्येचे प्रमाण लक्षात घेऊन ६ खाटांच्या प्राथमिक आरोग्य केंद्रांचे ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयामध्ये तसेच ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयांचे ५० तसेच १०० खाटांच्या उप जिल्हा रुग्णालयांमध्ये तसेच २०० खाटांच्या सामान्य रुग्णालयांचे ३०० तसेच ४०० खाटांच्या रुग्णालयांमधे श्रेणीवर्धन करणेबाबतचे प्रस्ताव वेळोवेळी शासनास प्राप्त होतात त्यानुसार शासन स्तरावरुन कार्यवाही करण्यात येते.

तसेच वर्ग १ आणि वर्ग २ च्या रिक्त पदांची भरती करण्याबाबतची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे. तसेच वर्ग ३ आणि वर्ग ४ च्या रिक्त पदांची भरती करण्याबाबतची कार्यवाही आयुक्तालय स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात कोरोनाकाळातील आरोग्यसेवेच्या सक्षमीकरणासाठी आरोग्य विभागाला दुप्पट निधी देण्याबाबत

**(३४) ६७८८३ (२५-०८-२०२३). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.किशोर पाटील (पाचोरा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कोरोनाकाळातील आरोग्यसेवेच्या सक्षमीकरणासाठी सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात आरोग्य विभागाला दुप्पट निधी देण्याची घोषणा मा. मुख्यमंत्री यांनी केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आरोग्य विभागाने अनेक चांगल्या योजना राबविण्याचा निर्णय घेत अर्थसंकल्पात ६३३८ कोटी ४१ लाख रुपयांची मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात आरोग्य विभागाला केळव ३५०१ कोटी रुपयांची तरतूद केल्यामुळे आरोग्य विभागाची आर्थिक कोंडी झालेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने आरोग्य विभागाच्या मागणीनुसान निधी उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे?

**डॉ. तानाजी सावंत (१३-१०-२०२३) :**(१) (२) व (३) आरोग्य विभागाकडुन राज्य सर्वसाधारण कार्यक्रमातंर्गत योजनांसाठी सन २०२३-२४ करीता रु.६०२२.९९ कोटी इतक्या नियतव्ययांची मागणी प्रस्तावित केली होती.
सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात राज्य सर्वसाधारण कार्यक्रमातंर्गत योजनांसाठी रु.३५०१.०० कोटीचा अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे.
(४) आरोग्य विभागाकरिता आवश्यक असलेल्या वाढीव तरतुदीसाठी पावसाळी अधिवेशनात पुरक मागणीद्वारे रुपये ११८७.८० कोटी एवढा निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे.

---

## अंगणवाडी सेविकांना पर्यवेक्षिका संवर्गात सरळसेवेद्वारे नियुक्ती होण्याकरिता सेवेच्या अनुभवाचा कालावधी कमी करणेबाबत

**(३५) ६७८९१ (२३-०८-२०२३). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अंगणवाडी सेविका अंतर्गत पर्यवेक्षिका संवर्गात सरळसेवेद्वारे नियुक्ती होण्याकरिता अंगणवाडी सेविका या पदावर सतत १० वर्षे सेवा केल्याचा अनुभव लागतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इतर शासकीय कर्मचा-यांना बढती होण्याकरिता ५ वर्ष अनुभवांचा कालावधी ठेवण्यात आला असून त्याप्रमाणे अंगणवाडी सेविकांना ५ वर्षाचा कार्यकाळ ठेवण्याबाबत सचिव, महिला व बालकल्याण विभाग, यांना बुलढाणा जिल्हयातील ग्रामीण भागातील अंगवाडी सेविका व मदतनीस यांनी माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या मागणी संदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (०८-११-२०२३) :**(१) हे खरे नाही. सरळसेवेद्वारे पर्यवेक्षिका या पदावर नियुक्तीकरिता कोणताही पात्र उमेदवार अर्ज करू शकतो. तथापि, निवडीने नियुक्तीकरीता अंगणवाडी सेविकांना १० वर्षे सेवेचा अनुभव आवश्यक आहे.

(२) व  (३) बुलढाणा जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका यांचे याबाबत माहे जून २०२३ मध्ये निवेदन प्राप्त झाले आहे. अंगणवाडी सेविका ह्या एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतील मानधनी तत्त्वावरील आहेत. पर्यवेक्षिका या पदावर अंगणवाडी सेविकांची मर्यादित विभागीय परीक्षेद्वारे निवडीने नियुक्ती करिता १० वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिवती ( जि.चंद्रपूर) येथील ग्रामीण रुग्णालयात आकृतीबंधानुसार पद निर्मितीस मंजूरी देणेबाबत**

**(३६) ६८०३० (२८-०८-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१)जिवती ( जि.चंद्रपूर) येथील ग्रामीण रुग्णालयात आकृतीबंधानुसार पद निर्मितीस मंजूरी देण्यात येवून पद नियुक्ती करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांना दिनांक १० मे,२०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, सदर रुग्णालयात पद निर्मितीस मंजुरी देवून पद नियुक्ती करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (०६-१०-२०२३) :**(१) होय.
(२) शासन पत्र दिनांक ९ जानेवारी, २०२३ अन्वये जिवती (जि.चंद्रपूर) येथील ग्रामीण रुग्णालयात आकृतीबंधानुसार पद निर्मिती करणेबाबतच्या प्रस्तावावर त्रुटींची पुर्तता करणेबाबत आयुक्तालयास कळविण्यात आले होते.
त्यानुसार, आयुक्तालय यांचे दिनांक २ मे, २०२३ रोजीच्या प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने त्रुटींची पुर्तता झालेली असल्याने वित्त विभागाच्या उपसमिती व उच्चस्तरीय समितीसमोर सदर प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्ह्यात बालकांच्या कुपोषणाची प्रकरणे पाच वर्षात दुप्पट झालेबाबत**

**(३७) ६८४२८ (२३-०८-२०२३). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील बालकांच्या कुपोषणाची प्रकरणे पाच वर्षांत दुप्पट झाल्याचे वृत्तपत्राच्या माध्यमातून दिनांक २ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या जिल्हयातील कुपोषणाची समस्या समूळ नष्ट करण्यासाठी प्रशासन दरवर्षी कोटयावधी रुपये खर्च करीत असून देखिल जिल्हयात १८५२ बालके कुपोषित असून १८१ बालके ही तीव्र कुपोषित (सॅम) असून १६७१ बालके मध्यम स्वरुपाचे (मॅम)कुपोषित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ठाणे जिल्हा परिषदेने बाल कुपोषण प्रकरणांचा अभ्यास आणि नियंत्रणासाठी IIT-B च्या सेंटर फॉर टेक्नॉलॉजी अल्टरनेटिव्हज फॉर रुरल एरिया (CTARA) मधील तज्ञांची मदत घेतली आहे ,हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ठाणे जिल्ह्यातील बालकांचे कुषोषण रोखण्यसाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात यत आह,
(५) नसल्यास, विलंबणाचे कारण काय आहे ?

**कुमारी आदिती तटकरे (०८-११-२०२३) :**(१) हे खरे नाही.

ठाणे जिल्हयातील मागील पाच वर्षाचे मासिक प्रगती अहवालानुसार कुपोषणाचे प्रमाण खालीलप्रमाणे आहे:-

| वर्ष | वजन घेतलेल्या बालकांची संख्या | सर्वसाधारण बालके | मध्यम कुपोषित बालके | तीव्र कुपोषित बालके |
|---|---|---|---|---|
| २०१९ | २३५३९६ | २०५२०२ | २७८४५ | २३४९ |
| २०२० | २५४६२२ | २१४१११ | ३३८५१ | ६६६० |
| २०२१ | २५०५०२ | २१५२७४ | ३११०४ | ४१२४ |
| २०२२ | २७०३४५ | २४२४७५ | २४६३० | ३२४० |
| २०२३ | २६६०४९ | २४३००९ | २०३६१ | २६७९ |

(२) हे खरे आहे
माहे जुलै २०२३ च्या मासिक प्रगती आहवालानुसार ठाणे जिल्हयाची कुपोषण स्थिती खालीलप्रमाणे आहे:-

| वर्षे | वजन घेतलेल्या बालकांची संख्या | सर्वसाधारण बालके | मध्यम कुपोषित बालके | तीव्र कुपोषित बालके |
|---|---|---|---|---|
| जुलै २०२३ | २३३१०९ | २११८९६ | १८६०५ | २६०८ |

(३) हे खरे आहे
(४) कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने खालील उपाययोजना करण्यात येतात.

१. एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत ६ महिने ते ३ वर्षे वयोगटातील बालकांना, गरोदर महिला, स्तनदा मातांना THR व ३ ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना गरम ताजा आहार देण्यात येतो.

२. आदिवासी प्रकल्पामध्ये भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना सुरु आहे. सदर योजनेंतर्गत गरोदर महिला व स्तनदा मातांना एक वेळचा चौरस आहार देण्यात येतो व ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना आठवडयातून ४ दिवस अंडी / केळी देण्यात येते. या ४ दिवसांमध्ये शाकाहारी बालकांना प्रति दिन २ केळी व मांसाहारी बालकांसाठी १ अंडे देण्यात येते.

३. राज्यातील सॅम बालकांसाठी ग्राम बाल विकास केंद्र सुरु करण्यात आली आहेत. ग्राम बाल विकास केंद्रामध्ये तीन वेळचा अतिरिक्त आहार व आरोग्य खात्यामार्फत औषधोपचार करण्यात येतात.

४.राज्यात पोषण अभियान अंतर्गत अंगणवाडी केंद्रातील बालकांचा, किशोरवयीन मुली व महिलांचा पोषणाचा दर्जा सुधारण्यासाठी व कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध स्तरावरुन निरंतर शिक्षण वृध्दी दृष्टीकोन (ILA) समुदाय आधारित कार्यक्रम (CBE), रिअल टाईम मॉनिटरींग (ICT- RTM) व जन आंदोलन इत्यादी उपक्रम राबविण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही

---

## राज्यात रक्तपेढयांमध्ये रक्ताचा तुटवडा निर्माण झाल्याबाबत

**(३८) ६८५१८ (२८-०८-२०२३). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध रक्तपेढयांमध्ये अवघे ५६ हजार युनिट रक्त उपलब्ध असल्याची बाब माहे एप्रिल-२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय ,

(२) तसेच, मुंबईतील शासकीय रुग्णालयात किती रक्तपेढया उपलब्ध आहे, त्यापैकी किती रक्तपेढीमध्ये रक्ताचा पुरवठा उपलब्ध आहे, सदरहू रक्तपेढयामध्ये कोणकोणत्या संस्थांकडून अथवा अन्य ठिकाणाहून रक्तपुरवठा केला आहे त्या संस्थांची नावे काय आहेत, तसेच, सदर रक्ताची कश्याप्रकारे विभागणी करण्यात येते,
(३) असल्यास, राज्यात निर्माण झालेला रक्ताचा तुटवडा दुर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (३०-१०-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) मुंबईमध्ये एकूण १६ शासकीय/निमशासकीय (कॉर्पोरेशन) रक्तकेंद्रे कार्यरत आहेत. सदर १६ रक्तकेंद्रांमध्ये दिनांक २१.०४.२०२३ रोजी एकूण १०९९ युनीट एवढे रक्त उपलब्ध होते. या व्यतिरिक्त मुंबईमध्ये धर्मदाय संस्था संचलित, इंडियन रेड क्रॉस संचलित व खाजगी असे एकूण ३९ रक्त केंद्रे आहेत. दिनांक २१.०४.२०२३ रोजी यांचे रक्त संकलन ४३१५ युनीट एवढे होते. मुंबईची रक्ताची दैनिक गरज सर्वसाधारणपणे ९०० ते १२०० युनीट एवढी आहे. रक्तकेंद्रामध्ये कोणत्याही संस्थेमार्फत रक्त पुरवठा करण्यात येत नाही. रक्तकेंद्रामार्फत संकलित करण्यात येणारे रक्त हे स्वैच्छिक रक्तदानाच्या माध्यमातून संकलीत करण्यात येते.
रक्ताची विभागणी आर.बी.सी.पॅक सेल्स, प्लेटलेट्स, प्लाझमा, क्रायो अशाप्रकारे करण्यात येते.
(३) राज्य रक्त संक्रमण परिषदेमार्फत विविध सामाजिक, धार्मिक, राजकीय इ. संस्थांना रक्तदान शिबीरे आयोजित करण्याविषयी आवाहन करण्यात येते. त्यानुषंगाने या संस्थांमार्फत रक्तदान शिबीरे आयोजित करण्यात येतात. रक्ताचा वापर व स्वैच्छिक रक्तदानाद्वारे रक्ताची भरपाई होणे ही श्रृंखला सतत सुरु असते. तसेच एका रक्तकेंद्रात जास्त असलेले रक्त दुसऱ्या गरज असलेल्या रक्तकेंद्रास पाठविण्यात येते. त्यामुळे रक्ताचा तुटवडा निर्माण होत नाही. यामध्ये राज्य रक्त संक्रमण परीषद ही समन्वयकाचे काम करते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर शहरातील विडी कामगारांसाठी स्वतंत्र हॉस्पीटल करण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याबाबत

**(३९) ६८५८५ (२३-०८-२०२३). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सोलापूर शहरातील विडी कामगारांसाठी स्वतंत्र हॉस्पीटल करण्याचा प्रस्ताव गेल्या अनेक वर्षापासून शासनाकडे प्रलंबित असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरत्यान निदर्सनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहरात ६० हजाराहून अधिक विडी कामगार असल्याने या कामगारांना केंद्रीय श्रम मंत्रालय आणि राज्य सरकारच्या कामगार विभागाकडून कोणत्याच सुविधा मिळत नसल्याचे या कामगारांचे आरोग्य धोक्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त शहरातील विडी कामगारांच्यासाठी स्वतंत्र हॉस्पीटल उभारण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (०१-११-२०२३) :** (१) व (२) खरे नाही.
(३) सोलापूर जिल्हयातील विडी कामगारांसाठी केंद्र शासनाचे बिडी वेल्फेअर दवाखाना कार्यरत असून, येथे विडी कामगारांना प्रथमोपचारांच्या सुविधा पुरविल्या जात आहेत. तसेच ग्रामीण रुग्णालय स्थापन करण्याबाबत जिल्हाधिकारी यांना दिलेल्या सूचनेनुसार जिल्हा शल्यचिकित्सक, सोलापूर यांच्याकडून प्रस्तावीत रुग्णालयासाठी जागा उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही सुरू असल्याचे सार्वजनिक आरोग्य विभागाकडून कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धुळे जिल्ह्यात महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना, आयुष्मान भारत प्रधानमंत्री आरोग्य योजने अंतर्गत कार्यरत असलेल्या

**(४०) ६८५९४ (२८-०८-२०२३). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यात महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना, आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत कार्यरत असलेल्या आरोग्य मित्रांचा वेतन वाढीचा प्रश्नासह अनेक मागण्या शासनाकडे प्रलंबित असल्याचे दिनांक ११ मे २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१३-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही.

एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत तृतीय प्रशासक कंपणीकडून आरोग्य मित्रांची नियुक्ती करण्यात येते. आरोग्य मित्र हे पुर्णत: तृतीय पक्ष कंपनीचे कर्मचारी असल्याने त्यांचे वेतन व सेवा विषयक बाबी या तृतीय पक्ष कंपनीकडून हाताळण्यात येतात.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वरुड (जि.अमरावती) येथे कुटीर रुग्णालयास मान्यता प्रदान करणेबाबत

**(४१) ६८८९८ (२८-०८-२०२३). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरुड (जि.अमरावती) या शहराची जवळपास ७० हजार लोकसंख्या असून या शहरास लागून असलेल्या ग्रामीण भागातील जनतेला आरोग्य विषयक सुविधा मिळण्यासाठी येथे आरोग्य विषयक सोयी- सुविधा वाढविणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरुड येथील ग्रामीण रुग्णालयास दर्जोन्नत करुन ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालयास मान्यता प्रदान करण्यात आलेली असल्यामुळे उपजिल्हा रुग्णालयाची नविन इमारत अस्तीत्वात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, ग्रामीण रुग्णालय, वरुड या इमारतीमध्ये नगर परिषद, वरुड मार्फत चालविण्यासाठी कुटीर रुग्णालयास शासन मान्यता देणेसाठी ग्रामस्थ-नागरिकांकडून मागणी करण्यात आली असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,याबबात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (०६-०९-२०२३) :** (१) होय.

(२) होय.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक शहरातील पंचवटी भागात कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवरून पंचवटी नाशिक येथे विशेषोपचार रुग्णालय किंवा सामान्य रुग्णालय स्थापन करण्याबाबत

**(४२) ६९०२० (२८-०८-२०२३). ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरात कुंभमेळयाच्या पार्श्वभूमीवर पंचवटी येथे ३०० खाटांचे विशेषोपचार रुग्णालय किंवा सामान्य रुग्णालय स्थापन करण्याबाबत मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री व मा.सार्वजनिक आरोग्यमंत्री तसेच सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांना स्थानिक प्रतिनिधी यांनी दिनांक २० फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे मागणी केली होती ,हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदरील मागणीच्या अनुषंगाने अवर सचिव,सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी दिनांक ३१ मार्च,२०२३ संदर्भ क्रमांक संकीर्ण २०२३ प्र.क्र.३०/ आरोग्य-३ व्दारे संचालक-१ आरोग्यसेवा आयुक्तालय,आरोग्य भवन,मुंबई यांना सदरील प्रकरणी तातडीने प्रस्ताव सादर करणेबाबत आदेशित केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,सदर प्रस्ताव तातडीने सादर करण्याबाबत लेखी आदेश असताना संचालक-१ आरोग्यसेवा आयुक्तालय,आरोग्य भवन, मुंबई यांनी अद्याप पर्यंत कोणतेही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय ,

(४) असल्यास, नाशिक येथे सन २००३ मधे झालेल्या कुंभमेळा दरम्यान पंचवटी येथे चेंगराचेंगरी होवून २१ भाविकांना वेळेवर तातडीने उपचार न मिळाल्याने ते मृत्यूमुखी पडले तर १५० भाविक गंभीर जखमी झाले होते त्या अनुषंगाने पंचवटी नाशिक येथे सन २०२७ च्या कुंभमेळाच्या पार्श्वभूमीच्या अनुषंगाने तातडीने प्रस्ताव तयार करून प्रशासकीय मान्यता,निधी मंजुरी ह्या प्रक्रिया तातडीने करुन रुग्णालयाचे प्रत्यक्षात काम सुरु होणे महत्त्वाचे होते तथापि अद्याप पर्यंत सदरील प्रस्तावाबाबत कोणतेही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे दिनांक १ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय ,

(५) असल्यास,पंचवटी भागात कुंभमेळयाच्या पार्श्वभूमीवरून येथे ३०० खाटांचे विशेषोपचार रुग्णालय किंवा सामान्य रुग्णालय स्थापन करण्याबाबत प्रस्ताव सादर करण्याबाबत व प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबनाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (०५-०९-२०२३) :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) हे खरे नाही.

आयुक्तालयाचे पत्र दिनांक २२.०६.२०२३ अन्वये क्षेत्रिय कार्यालयाकडून प्रस्ताव मागविण्यात आला आहे.

(५) सदर प्रस्ताव शासनास अप्राप्त आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गेवराई (जि.बीड) तालुक्यातील आरोग्य उपकेंद्रांच्या ईमारत दुरुस्तीसाठी प्राप्त निधीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(४३) ६९१४७ (२८-०८-२०२३). श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेवराई (जि.बीड) तालुक्यातील आरोग्य उपकेंद्रांच्या ईमारत दुरुस्तीसाठी माहे ऑगस्ट, २०२० मध्ये वा त्यादरम्यान राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत प्रत्येकी ०५ लक्ष ७५ हजार रुपये मंजूर झाले होते ,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्याप पर्यंत यापैकी कुठल्याच उपकेंद्राचे काम पूर्ण झाले नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या उपकेंद्रापैकी राक्षसभूवन येथील उपकेंद्राचे दुरुस्तीचे काम केले असल्याचे दाखवून कंत्राट दारास कामाचे देयक अदा केले असल्याचे ही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय ,

(४) असल्यास ,कामांची सद्यस्थिती व अदा केलेल्या देयकांची खरी माहिती शासनास प्राप्त व्हावी यासाठी या प्रकरणाच्या तपासासाठी विशिष्ट समिती स्थापन करुन चौकशी करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?

**डॉ. तानाजी सावंत (२०-१०-२०२३) :**(१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) काम न करता देयक वितरीत करण्यात आलेली नाहीत. तसेच गेवराई तालुक्यातील ३० उपकेंद्राचे आरोग्यवर्धिनी केंद्राची दुरूस्ती नुतनीकरण करण्याचे काम पूर्ण झाले आहे. तरी, गेवराई तालुक्यातील कामाबाबत कोणतीही लेखी तक्रार प्राप्त नसल्यामुळे विशिष्ट समिती स्थापन करून चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर जिल्हयातील भोरगड व झिलपा,कोंढाळी,नरखेड येथील आरोग्य केंद्र व ग्रामिण रुगणालयासंदर्भात**

**(४४) ६९२३८ (२८-०८-२०२३). श्री.अनिल देशमुख (काटोल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोरगड व झिलपा (ता. काटोल,जि नागपूर) येथील प्राथमीक आरोग्य केंद्राला मंजुरी असून येथे नविन इमारत बांधकामला मंजुरी देवून ती बांधण्यात आली आहे तथापि सदर केंद्रे कार्यान्वित करण्याकरीता अधिकारी व कर्मचारी यांची पदे मंजुर करण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे,हे खरे आहे काय,
(२) तसेच,कोंढाळी (जि.नागपूर) येथील ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाचे सन २००३ मध्ये सुरु करण्यात आलेले काम सुमारे ४.८४ कोटी रुपये खर्च करूनही अद्यापही अपूर्ण असून सदर काम पुर्ण करण्यास आणखी ११ कोटी रुपयांची गरज असल्याने उर्वरीत बांधकामाचे सुधारीत अंदाज पत्रकास प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे , हे ही खरे आहे काय,
(३) तसेच,नरखेड (जि. नागपूर) येथील ग्रामिण रुग्णालयामध्ये ३० खाटांचे ५० खाटांमध्ये श्रेणीवर्धन करण्याबाबचा प्रस्ताव शासनास सादर झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे,
(५) असल्यास, त्यानुसार उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (०६-१०-२०२३) :**(१) शासन निर्णय दिनांक १८ जुलै, २०२३ अन्वये नव्याने स्थापन करण्यात आलेल्या आरोग्य संस्थाकरिता पद निर्मिती करण्यात आली आहे.
(२) होय.
(३) होय.
(४) कोंढाळी, जि.नागपूर येथील ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाचे उर्वरीत बांधकामास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यासाठी व्यय अग्रक्रम समितीची मान्यता घेण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) शासन पत्र दिनांक ५ व १८ जानेवारी, २०२३ अन्वये नरखेड जिल्हा नाशिक ग्रामीण रुग्णालयाच्या श्रेणीवर्धन प्रस्तावातील उपस्थित मुद्यांचे स्पष्टीकरण व माहिती मागविण्यात आलेली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिवताप विभागातील सर्व संवर्गातील कर्मचाऱ्यांना जुन्या प्रवेश नियमाप्रमाणेच कार्यात्मक पदोन्नती व सुधारीत सेवाअंतर्गत आश्वासित प्रगती योजनेची प्रलंबित असलेली प्रकरणे त्वरीत निकाली काढण्याबाबत

**(४५) ६९४७७ (२८-०८-२०२३). श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील हिवताप योजनेतील गट-क संवर्गातील अवैद्यकीय आरोग्य अधिकारी, आरोग्य पर्यवेक्षक, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी, आरोग्य सहाय्यक, बहुद्देशिय आरोग्य कर्मचारी व गट-क संवर्गातील क्षेत्र कर्मचारी या संवर्गाबाबत शासनाने सेवाशर्ती विषयक दिनांक २९ सप्टेंबर, २०२१ रोजी नव्याने अधिसुचना निर्गमित केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अधिसुचनेतील सेवाविषयक अटी व शर्तींमुळे, राज्यातील पाच हजार आरोग्य कर्मचाऱ्यांना पदोन्नती व आश्वासित लाभापासून वंचित राहावे लागणार असल्याचे तसेच भविष्य काळात आरोग्य विभागातील आरोग्य सेवक हे पदच रद्द होणार असल्याची भिती कर्मचाऱ्यांचे मनामध्ये निर्माण झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अधिसुचना शासनाने निर्गमित केल्यावर कर्मचारी संघटना तसेच आरोग्य अधिसुचना विरोधी संघर्ष समिती, महाराष्ट्र राज्य यांच्या पदाधिकाऱ्यांनी अधिसुचना रद्द करणेबाबत तसेच अन्य मागण्यांप्रकरणी शासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत वारंवार बैठकी घेऊनही त्याबाबत अद्याप कार्यवाही झाली नसल्याचेही माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संघटनेने शासकीय अधिकाऱ्यांसमवेत झालेल्या बैठकीमध्ये, हिवताप योजनेतील कर्मचारी-अधिकाऱ्यांसदर्भात अधिसुचना रद्द करण्यासह अन्य प्रस्तावित मागण्या मान्य करण्यात याव्यात अथवा दिनांक ५ जुलै, २०२३ रोजी पासून आझाद मैदान, मुंबई येथे आमरण उपोषणाचे तीव्र आंदोलन करण्याचा इशारा शासनास दिला असून त्याबाबतचे सविस्तर निवेदन प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, यांना दिनांक १४ जून,२०२३ रोजी वा त्यासुमारास दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, कर्मचाऱ्यांच्या मागणीनूसार दिनांक २९ सप्टेंबर, २०२१ ची अधिसूचना रद्द करुन अन्य प्रस्तावित मागण्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (२३-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

आरोग्य सेवक हे पद रद्द करण्याचे प्रस्तावित नाही.तसेच सेवाप्रवेश नियमाच्या अधिसुचनेत आवश्यकत्या सुधारणा करून प्रस्ताव मान्यतेस्तव सादर केलेला आहे.

(३) हे खरे नाही.

दि.२९.०९.२०२१ च्या अधिसुचनेत आवश्यकत्या सुधारणा करण्याबाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्ताव मान्यतेच्या अंतिम टप्प्यात आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) दि.२९.०९.२०२१ च्या अधिसुचनेत आवश्यकत्या सुधारणा करण्याबाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती येथील विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय ( सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल) येथे रक्तपेढी सुरु करणेबाबत**

**(४६) ६९५०९ (२८-०८-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथील विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय ( सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल) येथे सन २०१५ मध्ये राज्य रक्त संक्रमण परिषदेमार्फत रक्तपेढीला मंजुरी दिल्यानंतर आवश्यक मनुष्यबळ आणि यंत्रसामुग्री उपलब्ध नसल्याने सदर रक्तपेढी अद्यापही सुरु झाली नसल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर रुग्णालयात दररोज ४० ते ५० रुग्ण हे डायलिसिस करीता येत असून या ठिकाणी विविध गंभीर शस्त्रक्रियादेखील होत असल्यामुळे रुग्णांना रक्ताची गरज असताना येथे रक्तपेढी नसल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सद्यस्थितीत जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथे जिल्हा स्तरावरील एकमेव शासकीय रक्तपेढी कार्यरत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय (सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल) येथे रक्तपेढी सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१३-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) रक्तपेढीसाठी आवश्यक वैद्यकीय उपकरणे व साहित्य सामुग्री तसेच इतर विभागाकरीता लागणारे उपकरणे व साहित्य सामुग्री खरेदी करण्यासाठी लागणाऱ्या निधीसाठी शासन निर्णय दिनांक ०४.०७.२०२३ मधील परिशिष्ट-ई अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून सदर उपकरणे व साहित्य सामुग्री खरेदी करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नेरळ परिसरातील कडव गावात राहणाऱ्या महिलेच्या अर्भकाचा वेळेवर उपचार न मिळालयाने झालेला मृत्यू.**

**(४७) ६९८२२ (२८-०८-२०२३). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेरळ परिसरातील कडव गावात राहणाऱ्या ३० वर्षीय महिलेला प्रसूती कळा सुरु झाल्यानंतर नातेवाईकांनी तिला कर्जत येथील शासकीय रुग्णालयात नेले असता तिची प्रसूती अवघड असल्याने तेथील डॉक्टरानी तिला दाखल करून न घेता उल्हासनगर येथे हलविण्याचा सल्ला दिला,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महिलेला उल्हासनगरमधील सेन्ट्रल रुग्णालयात नातेवाईकांनी आणले असता तेथील डॉक्टरानीही उपचार करण्यास नकार दिला आणि त्या महिलेला ठाणे येथील सिव्हिल रुग्णालयात नेण्यास सांगितले असता ठाणे कडे जाताना वाटेतच तिची प्रसूती झाल्याने अर्भकाचा पोटातच मृत्यू झाला असल्याचे माहे मार्च, २०२३ च्या शेवटच्या आठवडयात वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सबंधित दोषीविरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१३-१०-२०२३) :**(१) व (२) सौ.संगिता विठ्ठल पवार, रा.लाखाची वाडी, ता.कर्जत, जि.रायगड ही महिला दि.२०.०३.२०२३ रोजी उपजिल्हा रूग्णालय, कर्जत येथे प्रसूतीकरिता दाखल झाली असता कर्तव्यावरिल स्त्रीरोगतज्ञांनी तिची तपासणी केली असता बाळाने पोटात शी केल्याचे दिसून आल्याने व बाळ Fetal Distress मध्ये जाण्याची दाट शक्यता असल्याने सदर महिलेस मध्यवर्ती रूग्णालय, उल्हासनगर येथे संदर्भित करण्यात आले.

त्यानुसार सदर महिलेस मध्यवर्ती रूग्णालय, उल्हासनगर येथे दाखल केले असता कर्तव्यावरील स्त्रीरोगतज्ञांनी त्यांची तपासणी करून औषधोपचार केले. तथापि, सदर रूग्ण अतिजोखिमेत असल्याने व बाळाच्या हृदयाचे ठोके लागत नसल्याने सदर रूग्णास शासकीय रूग्णवाहीकेने सामान्य रूग्णालय, ठाणे येथे संदर्भित करण्याचा निर्णय स्त्रीरोगतज्ञांनी घेतला. मात्र रूग्णाच्या नातेवाईकांनी छत्रपती शिवाजी महाराज रूग्णालय, कळवा येथे रूग्णास दाखल करण्याचे ठरवून सदर रूग्णालयात जात असताना वाटेत रूग्णवाहिकेत सदर महिलेची प्रसूती झाली. सदर महिलेस आरजीएमसी, कळवा रुग्णालय ठाणे येथे दाखल करून बाळाची तपासणी केली असता उपजत मृत्यू असल्याचे निर्दशनास आले.

(३) उप संचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, ठाणे यांच्या कार्यालयाकडून चौकशी समिती गठित करून दि.१९.०४.२०२३ रोजी प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे.

(४) रूग्णावर उप जिल्हा रूग्णालय, कर्जत येथे योग्य ते प्राथमिक उपचार करण्यात आले, तथापि, बाळाची व मातेची प्रकृती गंभीर होण्याची शक्यता पाहता संदर्भित केल्याचे चौकशीत दिसून आले. त्यामुळे कारवाईची आवश्यकता वाटत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धुळे जिल्ह्यात शासनाचा निधीतून प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र साहित्य व कर्मचारी नियुक्ती अभावी बंद असल्याबाबत

**(४८) ६९८६८ (२८-०८-२०२३). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांचे शासनाचा निधीतून कामे पूर्ण झाले असून गेल्या दोन वर्षापासून काही केंद्र साहित्य व कर्मचारी नियुक्ती अभावी बंद असल्याचे दिनांक १३ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आहे हे खरे आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोणकोणत्या आरोग्य केंद्रांमध्ये साहित्य, व कर्मचारी नियुक्त केलेले नाही याची तपासणी शासन करणार आहे काय ,

(३) असल्यास, अनेक आरोग्य केंद्रात निवासस्थान असूनही डॉक्टर मुक्कामी राहत नसल्याने रात्री - बेरात्री रुग्णांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१६-१०-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

सन २००१ च्या लोकसंख्येवर आधारित बृहत आराखडा शासन निर्णय दि. १७.०१.२०२३ अन्वये धुळे जिल्हयातील २ प्राथमिक आरोग्य केंद्र व ६ उपकेद्रांचे मार्च,२०२२ अखेर इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेले आहे.

(२) माहे मे, २०२३ अखेर प्राथमिक आरोग्य केंद्र, घोडदे,ता.साक्री व प्राथमिक आरोग्य केंद्र, वरूळ ता.शिरपूर येथे प्रत्येकी ०२ वैद्यकीय अधिकाऱ्यांची कंत्राटी स्वरूपात नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यामुळे मे, २०२३ पासून दोन्हीही प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य व वैद्यकीय सेवा पुरविण्यात येत आहे. ग्रामविकास विभाग, शासन निर्णय दि. १५.११.२०२२ अन्वये जिल्हा परिषद गट-क मधील सर्व संवर्गातील (वाहन चालक व गट-ड संवर्गातील पदे वगळुन) रिक्त पदे भरण्याबाबत मान्यता देण्यात आलेली आहे.तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रातील उर्वरित पदे बाहय यंत्रणेव्दारे भरणेबाबत कार्यवाही सुरु आहे.

साहित्य व साधनसामुग्री खरेदीबाबत सन २०२३-२०२४ च्या वार्षिक अंदाजपत्रकात तरतुदीची मागणी केलेली आहे. सद्य:स्थितीत साहित्य व साधनसामुग्री नजिकच्या प्राथमिक आरोग्य केंद्रातुन पुरविण्याबाबत आदेशित करण्यात आलेले आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माडग्याळ (ता.जत,जि.सांगली ) येथील ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(४९) ७००२८ (२८-०८-२०२३). श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माडग्याळ (ता.जत, जि.सांगली) येथील पन्नास गावातील आरोग्य सेवेसाठी रुग्णालय कर्मचारी निवासस्थान, ३० बेडचे ग्रामीण रुग्णालय उभारण्यात आले परंतू या रुग्णालयातील १७ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, रिक्त पदांमुळे तेथील डॉक्टर व वैद्यकीय कर्मचा-यांच्या सेवेवर परिणाम होत असल्याने या रुग्णालयातील रिक्त पदे त्वरीत भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२०-१०-२०२३) :**(१) व (२) अंशत: खरे आहे.

३ तदर्थ वैद्यकिय अधिकारी कंत्राटी पध्दतीने भरणेत आलेली आहेत. १ कंत्राटी औषधनिर्माण अधिकारी व वाहनचालक भरण्यात आला आहे. तसेच २ सुरक्षा रक्षक सुरक्षा मंडळाकडून नेमण्यात आले आहेत. रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंजनगाव सुर्जी (जि.अमरावती) येथील उपजिल्हा रुग्णालयात नवीन रक्तपेढी सुरु करणेबाबत**

**(५०) ७०३७० (२८-०८-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंजनगाव सुर्जी (जि.अमरावती) हे शहर जिल्ह्याच्या मुख्यालयापासून ७० किमी दूर असून या ठिकाणच्या ग्रामीण रुग्णालयात जिल्ह्यातील जास्त बाह्य रुग्ण विभागाची संख्या असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ग्रामीण रुग्णालयाचे ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयात श्रेणीवर्धन झाले असून सद्यस्थितीत इमारतीचे बांधकाम सुरु असून या रुग्णालयात येणाऱ्या रुगणांना रक्ताची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रुग्णालयात नवीन रक्तपेढी कार्यान्वित करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच या भागातील नागरिकांकडून होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपजिल्हा रुग्णालय, अंजनगाव सुर्जी येथे नवीन रक्तपेढी सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (०६-१०-२०२३) :** (१) होय.

(२) अंजनगांव सुर्जी ग्रामीण रुग्णालयाचे ३० खाटावरुन ५० खाटात श्रेणीवर्धन झालेले असून बांधकाम सुरु आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.